RNI NO. MAHMAR/2020/84035




BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ




शनिवार १२ जुलै २०२५ | वर्ष : ५ | अंक : १९५ | दैनिक | किंमत : ₹५/-

Saturday 12 July 2025 | Year : 5 | Issue : 195 | Daily | Rate: Rs. 5/-

# जनसुरक्षा विधेयकाचे नाव 'भाजप सुरक्षा विधेयक' करायला हवे : उद्धव ठाकरे

**नवी दिल्ली :** सध्या महाराष्ट्र विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरू आहे. अनेक मुद्द्यांवरून हे अधिवेशन गाजत आहे. विविध प्रश्नांवरून विरोधक सरकारला कोंडीत पकडायचा प्रयत्न करत आहेत. यातच, पूर्वी, जसा मिसा कायदा होता, टाडा कायदा होता तसाच आता हा जनसुरक्षाकायदा आणण्यात आला आहे. मला असे वाटते की, याचे नाव 'जन सुरक्षे' ऐवजी 'भाजप सुरतक्षा' करायला हवे, असे म्हणत, शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी सत्ताधाऱ्यांवर थेट निशाणा साधला. ते पत्रकारांसोबत बोलत होते.

ठाकरे म्हणाले, 'विधिमंडळात जन सुरक्षा कायदा, या नावाने एक कायदा आणला जात आहे. काल खालच्या सभागृहात तो बहुमताच्या जोरावर मंजूर करण्यात आला. सत्ताधारी पक्षाकडे पाशवी बहुमत आहे आणि ते त्याचा उपयोग अथवा दुरुपयोग करत आहेत. याला आमचा विरोध का आहे? ते आमच्या सदस्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले आहे.'

'सरकारच्या कथीनी आणि करणीमध्ये फरक दिसत आहे. ते सांगताना सांगत आहेत की, नक्षलवाद आणि दहशतवादाचा बिमोड करायचा आहे. मात्र, या विधेयकात, कुठेही नक्षलवाद अथवा दहशतवाद असा उल्लेख नाही. सुरुवातीला केवळ 'कडव्या डाव्या वीचारसरणीच्या संघटनांना' असे लिहिले आहे. खरे

> पूर्वी, जसा मिसा कायदा होता, टाडा कायदा होता तसाच आता हा जनसुरक्षाकायदा आणण्यात आला आहे. मला असे वाटते की, याचे नाव **'जन सुरक्षे ऐवजी भाजप सुरतक्षा'** करायला हवे. कारण भाजप विरोधात जो बोलेल, तो जणू काही देशद्रोही आहे, असा काही त्याचा समज आहे.
>
> **- उद्धव ठाकरे**

तर, आता डावे आणि उजवे यातील फरक कळण्याची आवश्यकता आहे. साधारणपणे त्यावेळी शिवसेना आणि भाजप आम्ही सोबत होतो. आम्हाला उजव्या विचारसरणीचे म्हणायचे आणि आम्ही आहोत. कारण आम्ही धर्म माणणारे आहोत.

*'जर देश विघातक शक्तींचा बिमोड करायचा असेल तर, आम्हाला विचारण्याची गरज नाही. आम्ही नक्कीच सरकारसोबत आहोत, राहू आणि राहणार. मात्र तुम्ही राजकीय हेतूने प्रेरित होऊन हे विधेयक आणत असाल आणि तसा त्याला वास येतोय. कारण मी म्हटले तसे, यात कुठेही नक्षलवाद, वैगेरे वैगेरे असा काही शब्दच नाहीये. यावेळी उद्धव ठाकरे यांनी विधेयकातील एक परिच्छेदही वाचून दाखवला आणि यात कुठेही दहशतवाद आणि नक्षलवाद हे शब्द नाही, असे म्हणत, हे सर्वसामान्य जनतेलाही कधीही, कुठेही उचलू शकतात आणि तुरुंगात टाकू शकता,' असा दावाही उद्धव ठाकरे यांनी केला.*




## जनसुरक्षा कायदा की सत्ता सुरक्षित ठेवण्याची व्यवस्था? काँग्रेसचा सवाल

**पुणे :** केंद्रीय गृहमंत्री देशातील नक्षलवादात 72 टक्के घट झाल्याचे सांगतात तर मग असे असताना राज्य सरकारला जनसुरक्षा कायदा लागू करण्याची गरज का भासते अशी टीका काँग्रेसने केली. शहरी नक्षलवाद आहे म्हणता तर मग तो सिद्ध करून दाखवा असे आव्हानही काँग्रेसने सरकारला दिले. पक्षाचे प्रदेश प्रवक्ते गोपाळ तिवारी म्हणाले, गृहमंत्री 2026 मध्ये संपूर्ण देश नक्षलवाद मुक्त होणार असल्याचे जाहीरपणे सांगत आहेत. त्याच मुलाखतींमध्ये ते देशातील नक्षलवादात 72 टक्के घट झाली असल्याचेही सांगतात. मग जनसुरक्षा कायदा का लागू केला जात आहे? ही जनतेच्या सुरक्षेची व्यवस्था आहे की स्वतःच्या सत्तेची ? सरकारच्या विरोधात कोणी काही बोलूच नये, सरकारवर टीका करू नये, सरकारच्या चुका जनतेमध्ये जाऊन सांगितल्या जाऊ नयेत यासाठीच हा नवा कायदा केला जात आहे. केंद्र व राज्य सरकारने अनेक स्वायत्त संस्थांवर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न केला. तरीही विरोधी आवाज, विरोधातील मते दडपणे त्यांना शक्य झालेले नाही. सक्त वसुली संचलनालय (इडी), निवडणूक आयोग यांना विरोधी पक्षांकडून प्रश्न विचारले जातच आहेत. हे कसे थांबवता येईल याचा विचार करून सरकार हा नवा कायदा आणत आहे असा दावा तिवारी यांनी केला.

# राज्यातील कुपोषणाचा प्रश्न आजही अधांतरीच!

**मुंबई :** राज्यात कुपोषणाचे प्रमाण कमी झाल्याचा दावा सरकारकडून करण्यात येत असला, तरी हा विळखा अजूनही घट्टच असून सरकारकडून आकड्यांचा खेळ केला जात असल्याचे आरोग्य क्षेत्रातील जाणकारांचे म्हणणे आहे. मे महिन्यात पाच वर्षापर्यंतच्या 47 लाख 19 हजार 144 बालकांचे वजन घेण्यात आले. यात 39 टक्के मुलांची वाढ खुंटलेली असल्याचे दिसून आले तर वय आणि वजनाचा विचार करता एकूण 18 टक्के मुलांचे वजन कमी असल्याचे निदर्शनास आले आहे. राज्यात नंदुरबारसारख्या आदिवासी जिल्ह्यात वाढ खुंटलेल्या मुलांची संख्या सर्वाधिक म्हणजे 66 टक्के आहे. येथे उंचीच्या तुलनेत कमी वजन असलेल्या मुलांची संख्या 12 टक्के, तर वयाच्या तुलनेत कमी वजन असणाऱ्या मुलांची संख्या 48 टक्के दिसून आली आहे. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणाच्या निष्कर्षांनुसार राज्यातील 16 जिल्ह्यांमध्ये 40 टक्क्यांपेक्षा अधिक बालकांमध्ये वाढ खुंटलेली दिसून आली आहे.



राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली आदिवासी भागातील कुपोषणाच्या तसेच माता-बाल मृत्यू प्रश्नासाठी गाभा समितीची स्थपन करण्यात आली असून दर तीन महिन्यांनी या समितीची आढावा बैठक होत असते. मात्र राज्यातील 16 आदिवासी जिल्ह्यांतील

> राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणाच्या पाचव्या फेरीत समोर आलेल्या निष्कर्षांनुसार राज्यातील 16 जिल्ह्यांमध्ये 40 टक्क्यांपेक्षा अधिक बालकांमध्ये वाढ खुंटलेली आहे. बालकांमध्ये वाढ खुंटलेली असल्यास ती कुपोषणाचं द्योतक मानली जाते. या जिल्ह्यांमध्ये सांगलीत 48 टक्के, चंद्रपूर येथे 47, गडचिरोली, नाशिकमध्ये प्रत्येकी 46, बुलढाणा, नंदुरबार येथे प्रत्येकी 45, सोलापूरमध्ये 44, परभणी, व सिंधुदुर्गमध्ये प्रत्येकी 43, हिंगोली, गोंदिया येथे प्रत्येकी 42, बीड 41, कोल्हापूर, पालघर 40 टक्के

कुपोषणापासून माता-बाल आरोग्याच्या परिस्थिती आजही अधांतरीच असल्याचे याक्षेत्रात काम करणाऱ्या सामाजिक संघटना व कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे.पोषण आहाराचा अभाव, रोगप्रतिकारशक्ती कमी झाल्यामुळे आजारपणाची प्रादुर्भाव, माता आणि बालमृत्यूंचे प्रमाण वाढणे, या सगळ्याचा एकत्रित परिणाम मुलांच्या कुपोषणाच्या स्थितीवर होतो. त्यामुळे कुपोषणावर मात करण्यासाठी सर्वांगीण प्रयत्नांची आवश्यकता दिसते. दुर्देवाने सरकार शक्तीपीठ महामार्ग तसेच पायाभूतप्रकल्पांवर जास्त लक्ष ठेवून आहे तर शिक्षण-संशोधन तसेच कुपोषणाच्या व माता-बाल आरोग्याकडे लक्ष देण्यास पुरेसा वेळही देत नाही व निधीही दिला जात नसल्याची खंत या क्षेत्रातील जाणकारांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

# नागपूरला पुराचा फटका



नागपूरला पावसाने झोडपलं; शेतकऱ्यांचे 400 कोटीहून अधिकचे नुकसान

**नागपूर :** 2023 मध्ये नागपुरात आलेला महापूर आणि त्यामुळे झालेल्या वित्तहानीचा फटका भाजपला 2024 मध्ये झालेल्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत फटका बसला. आता महापालिका निवडणुका निवडणुका तोंडावर आहेत. आणि पुन्हा एकदा शहर पावसात बुडाले. नागपूरकरांची प्रचंड गैरसोय झाली. त्याचा संताप त्यांच्या मनात आहे, याचाही फटका महापालिकानिवडणुकीत पक्षाला बसण्याची शक्यता आहे. एकूणच नागपूरचा पूर भाजप पाठ सोडत नसल्याचेच चित्र सध्या तरी आहे. 2014 नंतर नागपूरचा नावलौकिक देशात वाढला. याचे कारण नागपूरकर देवेंद्र फडणवीस राज्याचे मुख्यमंत्री झाले, येथील खासदार नितीन गडकरी केंद्रात मंत्री झाले. त्यामुळे सहाजिकच या शहराची चर्चा सर्वत्र झाली. गडकरींनी सिमेटच्या रस्त्यांचा धडाका लावला, त्याचा प्रचार आणि प्रसारही अधिक झाला, अनेक राष्ट्रीय पातळीवरच्या शैक्षणिक संस्थांचे जाळे शहरात विणले गेले. औद्योगिक क्षेत्रात गुंतवणुकीच्या घोषणा, करार जाले. प्रत्यक्षात गुंतवणूक आली नाही हा भाग वेगळा, मात्र चर्चा आणि गवगवा खुप झाला. सांगण्याचे कारण एकच की यामुळे नागपूर देशभर प्रसिद्धीला आले. प्रत्यक्षात या शहराची वाटचाल बकालतेकडे सुरू होती. सिमेटच्या रस्त्यामुळे नाल्या नष्ट झाल्या होत्या. नालेसफाईच्या नावाने बोंम्ब होती.

# कर्नाटकात नेतृत्वात कोणताही बदल नाही : प्रियांक खरगे

**पाटणा :** कर्नाटकातील मुख्यमंत्री आणि नेतृत्व बदलाच्या अटकळींना मंत्री प्रियांक खरगे यांनी असे सांगून पूर्णविराम दिला की, 'जेव्हा काँग्रेस अध्यक्ष, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि राज्य प्रभारी यांनी स्पष्टपणे सांगितले आहे की नेतृत्व बदलणार नाही... तेव्हा प्रकरण इथेच संपते'. दुसरीकडे, विरोधकांनी प्रश्न उपस्थित केल्यावर ते म्हणाले, 'विरोधकांना आणखी कोण सांगेल आणि त्यांना हे समजण्यासाठी किती वेळा लागतील?' बिहारमध्ये मतदार याद्यांच्या विशेष छाननी पुनरावृत्ती सुरू ठेवण्यास सर्वोच्च न्यायालयाने परवानगी दिल्याबद्दल ते म्हणाले, 'हे अंशतः स्वीकार्य आहे, परंतु आता ही गरज आणि विशेष सघन मोहीम का...



असे दिसते की निवडणूक आयोग आता सरकारच्या आदेशांचे पालन करत आहे... बिहार वगळता इतर कोणत्याही राज्यात मतदानासाठी आधार आणि इतर कागदपत्रे वैध आहेत का?... बांगलादेशी लोक देशात कसे घुसले?... सीमा इतक्या असुरक्षित का आहेत? पहलगाम हल्लेखोर कुठे आहेत? दरम्यान, कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री आणि भाजप खासदार बसवराज बोम्मई यांनी सध्याचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या पाच वर्षे पदावर राहण्याच्या दाव्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. त्यांनी शुक्रवारी सांगितले की, जोपर्यंत काँग्रेस हायकमांड स्वतः परिस्थिती स्पष्ट करत नाही तोपर्यंत हे राजकीय नाटक सुरूच राहील.

## कांचीपुरममधील डांबर प्रक्रिया कारखान्यात भीषण आग



**नवी दिल्ली :** तामिळनाडूतील कांचीपुरम मधील उथिरामेरूरजवळील असुर येथे असलेल्या एका डांबर प्रक्रिया कारखान्यात भीषण आग लागली. माहिती मिळताच उथिरामेरूर येथील अग्निशमन आणि बचाव पथके घटनास्थळी पोहोचली आहेत. आग विझवण्याचे काम सुरू आहे. घटनेची माहिती गोळा केली जात आहे.

## कंबोडियात नागरिकत्व रद्द करण्याचा अधिकार सरकारला मिळणार



**कंबोडिया :** कंबोडियाच्या संसदेने शुक्रवारी एक घटनादुरुस्ती मंजूर केली ज्यामुळे सरकारला देशाच्या हितसंबंधांना हानी पोहोचवण्यासाठी परदेशी शक्तींशी संगनमत केल्याबद्दल दोषी आढळणाऱ्यांचे नागरिकत्व रद्द करण्याचा अधिकार मिळेल. 125 सदस्यांच्या राष्ट्रीय सभेने संविधानाच्या कलम 33 मध्ये एकमताने दुरुस्ती मंजूर केली. या बदलामुळे आता सरकारला पहिल्यांदाच एखाद्या व्यक्तीचे नागरिकत्व रद्द करण्याची परवानगी देणारा कायदा करण्याची परवानगी मिळेल.

## मुंबई एक्स्प्रेस वेवर पुलावरून कोसळला भरधाव ट्रक

**मुंबई :** हरयाणामधील गुरुग्रामजवळ मुंबई एक्स्प्रेस वेवर आज एक भीषण अपघात झाला. या अपघातामध्ये एक भरधाव ट्रक नियंत्रण सुटून उड्डाणपुलावरून थेट खाली कोसळला. हा ट्रक खाली कोसळताच मोठा स्फोट झाला तसेच त्यात भीषण आग लागली. या आगीमध्ये ट्रकमधील लाखो रुपयांचं सामान जळून खाक झाले. या अपघाताबाबत प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार हा ट्रक खूप वेगात येत होता. यादरम्यान, चालकाचे या ट्रकवरील नियंत्रण सुटले आणि हा अपघात झाला. हा ट्रर्क ॲमेझॉनच्या डिलिव्हरी पार्टनरचा असल्याचे सांगण्यात येत आहे.

# बालाघाट येथे महाबोधि महाविहार मुक्ती आंदोलन अनिश्चितकालीन धरणे प्रदर्शन



**बालाघाट :** डॉ. बाबासाहेब चौक, बालाघाट, मध्य प्रदेश येथे महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन समितीच्या वतीने महाबोधी महाविहार मुक्ति आंदोलनाचे तत्वावधान 10 जुलै 2025 रोजी संपूर्ण त्रिरत्न बुद्ध विहार, बौद्ध नगर, कोसमी, बालाघाटात आणि निश्चितकालीन धरणा प्रदर्शनाचा प्रारंभ करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात भदन्त धम्मशीखरद्वारे परित्राण पाठ आणि ध्यान साधनेने झाली. भदन्त धम्मशीखर यांनी आषाढी पौर्णिमानिमित्त उपोसथचे महत्व स्पष्ट केले. तथागत बुद्ध यांनी उपोसथ मनाला शुद्ध, पवित्र, शांत आणि एकाग्र करण्यासाठी दिली. उपोसथचा उद्देश उपासना नाही, उलट द्वेष, घृणा, ईर्ष्या आणि दुर्भावना यांना नष्ट करणे आहे. ते म्हणाले की उपोसथचा भोजनाशी कोणताही संबंध नाही. तथापि, शरीराच्या आवश्यकतेनुसार योग्य आहार घेणे. खूप कमी आणि अधिक भोजन करणे आवश्यक आहे, कमी भोजन शरीरास नुकसान पोहोचते आणि अधिक भोजन आळस व आसक्तीला जन्म देते. यावेळी 'परित्राण पाठ आणि संघदान' परित्राण पाठ च्या नंतर संघ दान आणि समूह भोजन दिले. धम्म रैली त्रिरत्न बुद्ध विहार, कोसमी ते उपासक-उपासिका यांनी धम्म रैलीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, बालाघाट पोहोचले. माल्यार्पण आणि त्रिशरण-पंचशील - तेथे डॉ. आंबेडकर यांची प्रतिमा स्थापित केली गेली. भदन्त धम्मशीखर यांनी त्रिशरण आणि पंचशील प्रदान केले. धरणेच्या ठिकाणी धम्मशीखर आणि सामाजिक समूहाने महाबोधि महाविहार बौद्ध समुदायाला मागणी केली. तशी केंद्र सरकार, बिहार सरकार आणि सर्वोच्च न्यायालयात अपील केली. प्रदर्शनात सेंट्रल उपासक आणि उपासिका समाविष्ट, लोक महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाने आपली एकजुटता आणि समर्थन व्यक्त केले. महाबोधि महाविहार मुक्ती आंदोलनाची प्रमुख मागणी महाबोधि महाविहारचे व्यवस्थापन पूर्ण रूपाने बौद्ध समुदायाला सोपविण्यात यावे., बोधगया टेंपल ॲक्ट, 1949 पूर्णपणे रद्द करणे., 3. बौद्धिक घटनांमध्ये राज्य चे हस्तक्षेप समाप्त करणे. हे धर्म प्रदर्शन बौद्ध समुदायाची आस्था आणि अस्मिता संरक्षणासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. आंदोलनात्मक शांततापूर्ण पद्धती आपल्या मागणीसाठी आहेत आणि सरकारकडून त्वरित उठण्याची अपेक्षा आहे.

# PM मोदींसह RSS प्रमुख मोहन भागवतांनी निवृत्त व्हावे : काँग्रेस



**मुंबई :** राज्यात महापालिका, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग येत असून, दुसरीकडे बिहार निवडणुका आणि अन्य मुद्द्यांवरून राष्ट्रीय पातळीवरील राजकीय वातावरण तापताना पाहायला मिळत आहे. प्रधानमंत्री मोदी यांनी 75 व्या वर्षी निवृत्त होण्यावरून काँग्रेससह अन्य विरोधी पक्ष भाजपावर टीका करत आहेत. तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर निशाणा साधत आहेत. एका कार्यक्रमात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक यांनी सांगितलेल्या एका आठवणीचा संबंध प्रधानमंत्री मोदी यांच्या निवृत्तीशी जोडला जात आहे. परंतु, यातच आता प्रधान मोदी यांच्यासह मोहन भागवत यांनीही निवृत्त व्हावे, असे काँग्रेस नेत्यांनी म्हटले आहे. मोरोपंत पिंगळे एकदा म्हणाले होते की, जेव्हा पंचाहत्तरीची शाल अंगावर पडते त्याचा अर्थ आता थांबावे, तुमचे वय झाले आहे; बाजूला सरा, आम्हाला काम करू द्या, असा किस्सा मोहन भागवत यांनी एका कार्यक्रमात बोलतांना सांगितला. परंतु, यावरून मोहन भागवत यांचा रोख प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडे होता का? अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

# 1 ते 7 ऑगस्ट झारखंड विधानसभेचे पावसाळी अधिवेशन



**रांची :** शुक्रवारी झारखंड सचिवालयात मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत एकूण 27 प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. बैठकीत घेण्यात आलेल्या प्रमुख निर्णयांपैकी झारखंड विधानसभेचे पावसाळी अधिवेशन 1 ऑगस्ट ते 7 ऑगस्ट दरम्यान आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्यात युनिफाइड पेन्शन स्कीम लागू करण्यासही मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. याशिवाय, जमशेदपूरचे तत्कालीन सिव्हिल सर्जन डॉ. अरविंद कुमार लाल यांची बडतर्फी रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

बैठकीत, नवीन किरकोळ उत्पादन धोरणांतर्गत रोजंदारीवर विक्रेत्यांद्वारे किरकोळ उत्पादन दुकाने चालविण्यास परवानगी देण्यात आली आहे. यासाठी, नवीन धोरण पूर्णपणे लागू होईपर्यंत झारखंड राज्य पेये महामंडळ लिमिटेड द्वारे काम केले जाईल.

त्याच वेळी, कुम्हारिया मोर ते संग्रामपूर या एकूण 6.33 किमी लांबीच्या रस्त्याच्या पुनर्बांधणीसाठी 38.89 कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. हजारीबागचे तत्कालीन जिल्हा आणि अतिरिक्त सत्र न्यायाधीश दिनेश कुमार मिश्रा, जे सध्या लातेहार येथे तैनात आहेत, त्यांना रांचीहून दिल्लीला एअर ॲम्ब्युलन्सने नेण्यासाठी खर्च झालेल्या 5.75 लाख रुपयांच्या परतफेडीलाही मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

> **राज्यातील विविध पोलिस ठाण्यांमध्ये वापरल्या जाणाऱ्या बहुतेक वाहनांची आता जीर्ण अवस्था झाली आहे. पोलिस ठाण्यांमध्ये वाहनांची कमतरता आणि त्यांची खराब स्थिती लक्षात घेता, 1255 चारचाकी आणि 1697 दुचाकी खरेदी करण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे. ही वाहने जीईएम पोर्टलद्वारे खरेदी केली जातील, ज्यावर एकूण 146.79 कोटी रुपये खर्च येतील. जर जीईएम पोर्टलवर वाहने उपलब्ध नसतील, तर वित्त विभागाच्या अधिसूचना क्रमांक 2315 अंतर्गत दोन टप्प्यात खरेदी केली जाईल.**
>
> **- कॅबिनेट सचिव वंदना दादेल**

याशिवाय, दिवंगत मंत्री जगन्नाथ महातो यांच्या फुफ्फुस प्रत्यारोपणानंतर चेन्नईतील एमजीएम रुग्णालयात झालेल्या पुढील उपचारांसाठी 44.83 लाख रुपयांची परतफेड देखील मंजूर करण्यात आली. शेवटी, बिहार आणि झारखंड या उत्तर राज्यात असलेल्या एकात्मिक बिहार पंचायत राज वित्त महामंडळ लिमिटेडच्या कर्मचाऱ्यांच्या थकित पगाराच्या देयकासाठी झारखंड आकस्मिक निधीतून आगाऊ पैसे काढण्यासही मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे.






बहुजन सौरभ **संपादकीय**

# जनसुरक्षा विधेयक ? वंचितांची मुस्कटदाबी

महाराष्ट्र विधानसभेत सादर करण्यात आलेले जन सुरक्षा विधेयक (Public Safety Act) हे सध्या चर्चेचा आणि वादाचा विषय ठरत आहे. हे विधेयक सादर करताना सरकारने याचे समर्थन कायद्यासुव्यवस्था राखणे, सामाजिक शांतता अबाधित ठेवणे आणि राष्ट्रविरोधी कृतींना आळा घालणे या हेतूंनी केले आहे. परंतु यावर अनेक डावे, कडवे आणि काही उजवे विचारांचे पक्ष व संघटना टीका करत आहेत. 'जन सुरक्षा विधेयक' काय आहे. विधेयकाचे स्वरूप हे जम्मू आणि काश्मीरमधील पब्लिक सेप्टी ॲक्ट किंवा यूपीच्या गुंडा नियंत्रण कायद्यासारखे असल्याचे निरीक्षकांचे म्हणणे आहे. या विधेयकांतर्गत काही प्रमुख तरतुदी आहेत, एखाद्या व्यक्तीला सरकारकडून 'भविष्यात कायदा-सुव्यवस्थेला धोका निर्माण होऊ शकतो' या कारणास्तव तात्काळ अटक करण्याचा अधिकार, न्यायालयीन सुनावणीविना 3 महिन्यांपर्यंत तडीपार किंवा नजरकैदेत ठेवण्याची तरतूद, पोलीस किंवा प्रशासनाने ठरविल्यास संबंधिताला सार्वजनिक सभा, आंदोलन किंवा सोशल मीडियावर व्यक्त होण्यापासून रोखता येणे. सरकारची बाजू अशी की भाजप आणि शिंदे गटाने याला 'गुन्हेगारी, दहशतवाद, शहरी नक्षलवाद व जातीय तेढी' ला रोखण्यासाठी आवश्यक असलेले विधेयक म्हटले आहे. सरकारच्या मतानुसार, सामाजिक माध्यमांद्वारे द्वेषमूलक प्रचार थांबवणे गरजेचे आहे. धार्मिक ध्रुवीकरण करणाऱ्या शक्तींना आळा घालणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात जातीय, सांप्रदायिक किंवा देशविरोधी घोषणाबाजी करणाऱ्या टोकाच्या विचारसरणीच्या चळवळींना रोखणे आवश्यक आहे. डावे आणि कडवे डावे यांची भूमिका जाणून घ्यायला हवी. कम्युनिस्ट पक्ष, रिपब्लिकन चळवळीतील काही संघटना, विविध विद्यार्थी चळवळी, आंबेडकरी संघटना यांनी या विधेयकाला 'घातक आणि असंवैधानिक' ठरवले आहे. त्यांच्या मते, या विधेयकाचा वापर प्रस्थापित सत्तेच्या विरोधातील आवाज दडपण्यासाठी होईल. अदालतीन न्यायाशिवाय अटक म्हणजे नागरिकांच्या मूलभूत अधिकारांची मुस्कटदाबी. 'शहरी नक्षलवाद' किंवा 'जातीय तेढ' ही व्याख्या इतकी सैल आहे कोणत्याही विचारवंत, सामाजिक कार्यकर्त्याला त्यात अडकवता येऊ शकते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या तत्वांचा हा अपमान आहे. अशा वेळी भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची विचारधारा आणि भूमिका लक्षात घेणे अत्यंत आवश्यक ठरते. डॉ. आंबेडकर यांची वैचारिक भूमिका अत्यंत स्पष्ट होती – लोकशाही ही केवळ सरकारची व्यवस्था नसून ती सामाजिक, वैचारिक व वैयक्तिक स्वातंर्त्याची हमी असलेली मूल्यव्यवस्था आहे. जनसुरक्षा विधेयक डॉ. बाबासाहेबांचा दृष्टिकोन व्यक्तिस्वातंत्र्य संशयावर आधारित अटक, विना सुनावणी नजरकैद अभिव्यक्तीचे व संघटनेचे स्वातंत्र्य मूलभूत अधिकार सत्ता संतुलन कार्यकारी अधिकार वाढवतो शक्तीवर नियंत्रण आवश्यक न्यायप्रणाली सुनावणीशिवाय शिक्षा न्यायालयीन प्रक्रियेशिवाय शिक्षा अन्यायकारकसामाजिक चळवळी आंदोलकांना दडपण्याची शक्यता समाज परिवर्तनासाठी आंदोलने गरजेची अल्पसंख्याक अधिकार 'धोका' म्हणून लक्ष केले जाऊ शकते अल्पसंख्यकांचे अधिकार संरक्षित असावेत. डॉ. आंबेडकर यांचे कार्य हे वंचित, दलित, मागास समाज यांच्यासाठी आवाज उभा करण्याचे होते. हेच समाज आजही सामाजिक न्यायासाठी रस्त्यावर येतात. जनसुरक्षा विधेयकाचा वापर या आवाजांना गप्प करण्यासाठी होऊ शकतो, अशी भीती निर्माण झाली आहे. ही बाब डॉ. बाबासाहेबांच्या विचारांना पूर्णपणे विरोधात ठरते. उजव्या कडव्या शक्तींची जी प्रतिक्रिया आहे. त्यानुसार उदाहरणार्थ हिंदुत्ववादी संघटना या विधेयकाचे स्वागत करत आहेत. त्यांचा युक्तिवाद आहे की जिहादी, नक्षलवादी, धर्मांध, राष्ट्रविरोधी गट यांना थोपवण्यासाठी हे आवश्यक आहे. मात्र काही उजव्या विचारधारेचे उदारमतवादी विचारवंत मात्र सतर्क आहेत. त्यांच्या मते, याचा वापर सत्ताधारी पक्ष विरोधकांना गप्प करण्यासाठी करु शकतो. घटनात्मक व नैतिक चिंतेचे मुद्दे विचारात घेतले तर 'Due Process of Law' म्हणजेच कोणत्याही व्यक्तीला शिक्षा होण्यासाठी त्याला न्यायालयात पूर्णपणे ऐकून घेणे आवश्यक असते. हे विधेयक त्या मूल्याच्या विरोधात आहे. भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेद 19 (अभिव्यक्ती स्वातंत्र्य) यावर थेट घाला. दहशतवादविरोधी कायद्यांचा अतीव वापर जसा UAPA च्या बाबतीत झाला, तसाच धोका येथेही आहे. महाराष्ट्रातील जनसुरक्षा विधेयक हे सुरक्षा आणि स्वातंत्र्य या दोन मूल्यांमधील संघर्षाचे उत्तम उदाहरण आहे. एकीकडे राज्यातील प्रशासनाला अधिक अधिकार देण्याची गरज भासत असताना, दुसरीकडे हे अधिकार संविधानाच्या मूलभूत मूल्यांना धक्का देणारे ठरू शकतात. विशेषतः डावे आणि आंबेडकरी चळवळीतील नेत्यांना या विधेयकामुळे 'नागरिकांचे स्वातंत्र्य धोक्यात येईल' अशी गंभीर भीती वाटते. या विधेयकावर सर्वपक्षीय चर्चा, न्यायिक पुनरावलोकन व नागरिकांचा समावेश आवश्यक आहे. विधेयकात स्पष्ट अटी, काळमर्यादा, न्यायालयीन संमती, यांचा समावेश करणे अनिवार्य आहे. जनतेच्या स्वातंत्र्याचा गळा न घोटता सुरक्षा कशी राखायची, याचे संतुलन साधणे ही खऱ्या लोकशाहीची कसोटी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे लोकशाहीचे केवळ शिल्पकार नव्हते, तर लोकशाही मूल्यांचे जिवंत उदाहरण होते. जनसुरक्षा विधेयकाच्या विरोधात उभे राहणाऱ्या शक्तींनी डॉ. बाबासाहेबांचा आधार घेतला आहे, कारणहे विधेयक अधिकारांना संकुचित करते, सत्ता केंद्रीत करते. हे विधेयक संविधानाच्या मूल्यांवर घाला घालते. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, हे डॉ. बाबासाहेबांनी दिलेल्या स्वातंत्र्याच्या संकल्पनेला विरोध करते. ■ ■

# शिक्षणाच्या पलीकडे काय आहे ?



**शिक्षण? होय! 'शिक्षण' हाच एक पर्याय आहे जो आपल्याला प्रगतीकडे नेतो. जीवनामध्ये एक अशी वेळ येते कि जेव्हा आपण शिक्षणाबद्दल विचार करतो कि आपण आत्तापर्यंत जे शिक्षण घेतले ते पुरेसे आहे किंवा नाही आणि त्यानंतर आपल्याला प्रश्न पडतो कि 'शिक्षणानंतर काय?' आपल्याला असे वाटते कि इथे आपण शिक्षण सोडू शकतो का? पण मित्रांनो डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्याला हे उद्‌भवून दिले कि मानवजातीच काय पण इतर प्राणी देखील दैनंदिन व्यवहारात काही ना काही शिकतच असतात. जीवनामध्ये शिक्षण कधीच पूर्ण होत नसते. जरी आपल्या शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण पद्धतीमध्ये आपण परीक्षा देऊन शिक्षण घेतले तरी रोज त्यापलीकडे आपण काही ना काही शिकत असतोच.**

सर्व मानव बंधूना संविधानाने मूळ शिक्षण घेणे अनिवार्य केले असले तरी पुढील शिक्षण हे दैनंदीन अनुभवाने आपण शिकतच राहतो. भारतात शिक्षण हे समाजाच्या प्रगतीचा आधारस्तंभ आहे, जे लाखो लोकांच्या आकांक्षा घडवते आणि आर्थिक वाढीला चालना देते. शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांच्या विस्तृत जाळ्यासह, भारत जगातील सर्वात मोठ्या प्रमाणात पदवीधर तयार करतो. तथापि, पारंपरिक शिक्षण व्यवस्था, जी प्रामुख्याने शैक्षणिक गुणवत्तावर केंद्रित आहे, तिच्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. तंत्रज्ञानातील जलद प्रगती, जागतिकीकरण आणि बदलत्या कार्यबलाच्या मागण्यांसह जग विकसित होत असताना, 'शिक्षणाच्या पलीकडे' ही संकल्पना महत्त्व प्राप्त करत आहे. हा लेख भारतातील पारंपरिक शिक्षण व्यवस्थेच्या पलीकडे काय आहे याचा शोध घेतो, पर्यायी शिक्षण मार्ग, कौशल्य विकास आणि सर्वांगीण वाढीच्या संधींचा विचार करतो ज्या यशाची पुन्हा व्याख्या करत आहेत.

**शिक्षणाचे स्रोत :** शिक्षण हे जन्मापासूनच मिळत असते. बाळ जन्मल्यानंतर मातेकडूनच शिक्षणाचे बाळकडू पाजण्यात येते. जसजसे बाळ मोठे होते तसतसे शिक्षणाचे धडे पालकांकडून वडिलांकडून, घराच्या सभासदाकडून व ईतर नातेवाईकांकडून मिळत असतात. शालेय प्रवेशानंतर पाठ्य पुस्तकातून, शिक्षकवृंदाकडून व इतर मित्र मंडळींकडून शिक्षणाचे पाठ मिळत असतात. उच्चवर्गीय व कॉलेजच्या शिक्षणातून तर विस्तृतपणे शिक्षण मिळत असते. त्यानंतर उच्च पदवी, पीएचडी किंवा संशोधन शिक्षणातून तर काटेकोर शिक्षण मिळत असते. त्याचबरोबर समाजातील वर्गाकडून व्यावहारिक शिक्षणाची जोड होत असते व मुलास समाजात कसे वावरायचे, निर्णय कसे घ्यायचे, कोणत्या दिशेने आगेकूच करायचे याचे ज्ञान उपलब्ध होते. व्यवसाय निवडताना किंवा नोकरीच्या शोधात असताना, त्या व्यक्तीला त्याने अंगिकारलेल्या गुणामुळे पुढील वाटचालीस वाव मिळतो व तशाप्रकारची व्यवसायाची किंवा नौकरीची संधी प्राप्त करण्यात यशस्वी होतो. उद्योग किंवा नौकरीतही प्रशिक्षण संस्थांद्वारे शिक्षण उपलब्ध होत असते. प्रत्येक क्षेत्रातून जसे भौगोलिक, वैद्यकीय, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, विज्ञान, इंजिनीरिंग, संगणकीय, स्पेस, भूगर्भशास्त्र, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र अशा अनेक क्षेत्रातून शिक्षणात भर पडत असते. त्यामुळे शिक्षणाला पर्याय नाहीच असे म्हणावेसे वाटते. अशी म्हण आहे कि स्काय इस दि लिमिट पण मला सांगावयाचे आहे कि शिक्षणासाठी हि म्हण सुद्धा तोकडी वाटते. कारण आपण आताच बघत आहोत कि स्पेसमध्ये श्री. शुभम शुक्ला अंतराळातील स्टेशनमध्ये जाऊन दररोज 16 वेळा सूर्य उगवणे व सूर्य मावळण्याच्या क्रिया बघतो आहे. म्हणजे आता स्काय च्या लिमिटपेक्षा पुढे गेलेलो आहे. त्याचे मुख्य कारण म्हणजे शिक्षणच म्हणावे लागेल.

**पारंपरिक शिक्षणाच्या मर्यादा :-** भारताची शिक्षण व्यवस्था प्रशासकीय भूमिकांसाठी कार्यबल तयार करण्यासाठी डिझाइन केलेल्या औपनिवेशिक चौकटीत रुजलेली आहे. सुधारणांनंतरही, ती मोठ्या प्रमाणात परीक्षाकेंद्रित आहे. **प्रमुख मर्यादा खालीलप्रमाणे आहेत :-**कौशल्य सरेखनाचा अभावः अनेक पदवीधरांना उद्योगाशी संबंधित कौशल्यांचा अभाव असतो, ज्यामुळे शिक्षण आणि रोजगारक्षमता यांच्यातील अंतर निर्माण होते. **प्रवेशातील असमानता :-** ग्रामीण भागात अपुरी पायाभूत सुविधा, शिक्षकांची कमतरता आणि सामाजिक-आर्थिक अडथळ्यांमुळे गुणवत्तापूर्ण शिक्षण अनेकांना उपलब्ध नाही. **दबाव आणि मानसिक आरोग्य :-** शैक्षणिक कामगिरीवर तीव्र लक्ष केंद्रित केल्याने प्रचंड दबाव निर्माण होतो, ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये मानसिक आरोग्याच्या समस्या उद्भवतात. या मर्यादांमुळे पर्यायी मॉडेल्सकडे वाटचाल होत आहे, जे सर्वांगीण विकास, व्यावहारिक कौशल्ये आणि आजीवन शिक्षणावर लक्ष केंद्रित करतात.

**शिक्षणाच्या पलीकडील उदयोन्मुख ट्रेंड :-** 'शिक्षणाच्या पलीकडे' ही संकल्पना शिक्षणाच्या इकोसिस्टमला समाविष्ट करते जी अनुकूलता, नवकल्पना आणि वास्तविक-जागतिक प्रभावावर प्राधान्य देते. भारतातील शैक्षणिक लँडस्केपला आकार देणारे अनेक ट्रेंड खालीलप्रमाणे आहेत :-

**1. कौशल्य-आधारित शिक्षण आणि व्यावसायिक प्रशिक्षण :-** ऑटोमेशन आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या उदयामुळे, नियोक्ते डिग्रीपेक्षा कौशल्यांना महत्त्व देतात. स्किल इंडिया मिशन आणि नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (NSDC) सारख्या उपक्रमांचा उद्देश कोडिंग, डेटा विश्लेषण आणि आरोग्यसेवा यासारख्या व्यावसायिक कौशल्यांमध्ये लाखो लोकांना प्रशिक्षित करणे आहे. उदाहरणार्थ, प्रधानमंत्री कौशल विकास योजना (PMKVY) ने 2015 पासून 1 कोटींहून अधिक तरुणांना प्रशिक्षित केले आहे, ज्यामध्ये आयटी, उत्पादन आणि किरकोळ उद्योगांवर लक्ष केंद्रित आहे. ऑनलाइन प्लॅटफॉर्म्सनी कौशल्य-आधारित अभ्यासक्रमांना लोकशाहीकरण केले आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांना डिजिटल मार्केटिंग, मशीन लर्निंग आणि सायबरसुरक्षा यासारख्या क्षेत्रांमध्ये प्रमाणपत्रे मिळवता येतात. हे प्लॅटफॉर्म शैक्षणिक ज्ञान आणि उद्योगाच्या गरजा यांच्यातील अंतर कमी करतात, लवचिक आणि परवडणारे शिक्षण पर्याय प्रदान करतात. डिजिटल शिक्षण आजीवन शिक्षणला प्रोत्साहन देते, व्यावसायिकांना सतत कौशल्ये वाढवण्यास प्रोत्साहित करते. उदाहरणार्थ, काम करणारे व्यावसायिक ब्लॉकचेन किंवा क्लाउड कम्प्युटिंग यासारख्या विशिष्ट क्षेत्रांमध्ये मायक्रो-क्रेडेन्शियल्स किंवा नॅनो-डिग्रीज मिळवू शकतात, ज्यामुळे गतिमान नोकरी बाजारात स्पर्धात्मक राहणे शक्य होते. **2. उद्योजकता आणि नवकल्पना :-** भारताची स्टार्टअप इकोसिस्टम, जी जगातील सर्वात मोठ्या इकोसिस्टमपैकी एक आहे, तिने उद्योजकता शिक्षणाकडे वाटचाल प्रेरित केली आहे. अटल इनोव्हेशन मिशन (AIM) आणि स्टार्टअप इंडिया सारख्या कार्यक्रमांनी मार्गदर्शन, निधी आणि इनक्युबेशन समर्थन देऊन नवकल्पना वाढवली आहे. शाळा आणि महाविद्यालये उद्योजकता अभ्यासक्रम सुरू करत आहेत, ज्यामुळे विद्यार्थ्यांना पारंपरिक करिअर मार्गांच्या पलीकडे विचार करण्यास प्रोत्साहन मिळते. उदाहरणार्थ, IIT आणि IIM सारख्या संस्था आता स्टार्टअप इनक्युबेटर ऑफर करतात, तर T-Hub आणि NASSCOM सारख्या संस्था तरुण उद्योजकांना समर्थन देतात. हा बदल समस्या सोडवणे, जोखीम घेणे आणि सर्जनशीलता यावर जोर देतो जे कौशल्ये पारंपरिक वर्गांमध्ये क्वचितच जोपासली जातात. **3. सर्वांगीण शिक्षण आणि जीवन कौशल्ये :-** शैक्षणिक विषयांपलीकडे, भावनिक बुद्धिमत्ता, संवाद आणि गंभीर विचार यासारख्या जीवन कौशल्यांवर वाढता जोर आहे. प्रगतीशील शाळा आणि संस्था सामाजिक-भावनिक शिक्षण (SEL) आणि डिझाइन थिंकिंग यासारख्या कार्यक्रमांना अभ्यासक्रमात समाविष्ट करत आहेत. टीच फॉर इंडिया आणि प्रथम सारख्या उपक्रमांचा विशेषतः वंचित समुदायांसाठी सर्वांगीण विकासावर लक्ष आहे, ज्यामुळे नेतृत्व आणि लवचिकता वाढते. **4. जागतिक प्रदर्शन आणि क्रॉस-सांस्कृतिक शिक्षण :-** राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP) 2020 सारख्या उपक्रमांनी जागतिक क्षमता वाढवण्यावर जोर दिला आहे, परदेशी विद्यापीठांना भारतात कॅम्पस स्थापन करण्यास प्रोत्साहन दिले आहे आणि विद्यार्थी विनिमय कार्यक्रमांना चालना दिली आहे. हे प्रदर्शन विद्यार्थ्यांना सीमाविरहित अर्थव्यवस्थेसाठी तयार करते. राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP) 2020 हे भारतातील शिक्षणाची पुन्हा व्याख्या करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे. त्यातील प्रमुख वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत :- **बहुविषयक शिक्षण :-** सर्वांगीण विकासासाठी विषय निवडीमध्ये लवचिकता प्रोत्साहन. **व्यावसायिक समाकलन :-** उद्योगाच्या गरजांशी शिक्षण सरेखित करण्यासाठी 6 वीपासून व्यावसायिक प्रशिक्षण सुरू करणे. **तंत्रज्ञान समाकलन :-** तंत्रज्ञान-चालित भविष्यासाठी शाळांमध्ये डिजिटल साक्षरता आणि कोडिंगला प्रोत्साहन. **प्रादेशिक भाषांवर लक्ष :-** विशेषतः प्रारंभिक वर्षांमध्ये मातृभाषेत शिक्षण देऊन समावेशकता सुनिश्चित करणे. NEP चा उद्देश शिक्षणापासून क्षमता-आधारित शिक्षणाकडे वाटचाल करणे आहे, जे जागतिक मानकांशी सरेखित आहे. तथापि, त्याची यशस्विता प्रभावी अंमलबजावणीवर अवलंबून आहे, विशेषतः ग्रामीण भागात.

शिक्षणाच्या पलीकडे जाण्यातील आव्हाने - **डिजिटल अंतर :-** शहरी भागांना एडटेकचा लाभ होत असला, तरी ग्रामीण भारतात इंटरनेट प्रवेश आणि डिव्हाइस उपलब्धतेच्या समस्यांना सामोरे जावे लागते. **बदलाला प्रतिकार :-** पालक आणि शिक्षकांमधील पारंपरिक मानसिकता अनेकदा डिग्रीला कौशल्ये किंवा पर्यायी मार्गांपेक्षा प्राधान्य देते. **गुणवत्ता नियंत्रण :-** एडटेक आणि व्यावसायिक कार्यक्रमांच्या वेगवान वाढीमुळे मानक आणि विश्वासार्हतेबाबत चिंता निर्माण होते. **निधीची कमतरता :-** नाविन्यपूर्ण मॉडेल्सचा विस्तार करण्यासाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणुकीची आवश्यकता आहे, जी सार्वजनिक शिक्षणात अनेकदा मर्यादित असते. या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सरकार, खाजगी क्षेत्र आणि नागरी समाज यांच्यातील सहकार्य आवश्यक आहे जेणेकरून समान प्रवेश आणि गुणवत्ता सुनिश्चित होईल. **निष्कर्ष :-** भारतात शिक्षणाच्या पलीकडे जाणे म्हणजे शिक्षणाची व्यापक दृष्टी स्वीकारणे-जी डिग्री आणि वर्गखोल्यांच्या पलीकडे जाते. कौशल्ये, नवकल्पना आणि सर्वांगीण विकासाला प्राधान्य देऊन, भारत आपल्या तरुणांना गतिमान, जागतिकीकृत जगासाठी तयार करू शकतो. असमानता आणि बदलाला प्रतिकार यासारखी आव्हाने कायम असली तरी NEP 2020 आणि उद्योजकता कार्यक्रम यासारखे उपक्रम आशादायक बदल दर्शवतात. शिक्षणाच्या पलीकडील प्रवास म्हणजे व्यक्तींना शिकण्यास, अनुकूलन करण्यास आणि सतत बदलणाऱ्या लँडस्केपमध्ये यशस्वी होण्यास सक्षम करणे आहे, ज्यामुळे भारताची मानवी भांडवल ही त्याची महान संपत्ती बनते. शिक्षणाला मर्यादा नाहीत. एकंदरीत शिक्षण हेच विकासाचे केंद्र आहे व शिक्षण म्हणजेच विकास, परिवर्तन संरक्षण, आर्थिक प्रगती, सामाजिक प्रगती, वैज्ञानिक प्रगती, भौगोलिक प्रगती, वैचारिक प्रगती व राहणीमान उंचावण्याच एकमेव साधन होय. जागतिक प्रगती शिक्षणामुळेच साध्य होते म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटलेले आहे कि, 'शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, ते पिल्यानंतर व्यक्ती गुरगुरल्या शिवाय राहणा नाही'. शिक्षण अंतिम सत्य असून शिक्षणाला मुळीच अंत नाही. शिक्षणाच्या पलीकडे शिक्षणच परिवर्तनास शिक्षणच कार्यभूत आहे. म्हणून म्हटलेले आहे कि, सर्वबाबीत परिवर्तन होत राहील व परिवर्तन हि एकच बाब अशी आहे कि ती कॉन्स्टन्ट आहे. ■ ■

इंजि.चार्ली दादाजी फुलझेले,
मो. 9405147215

# प्रकाश तत्व प्रदीप्त करणारी गुरुपौर्णिमा



प्रत्येकाच्या आयुष्यात एक प्रकाश तत्व प्रदीप्त करणारी बाह्यशक्ति कार्य करीत असते, ती ज्ञानशक्तीच्या रूपाने, प्रेरणेने, श्रद्धेने, त्याशिवाय का आपल्याला मार्ग गवसतो? ते ज्ञान, मार्गदर्शन, प्रेरणा, श्रद्धा, विश्वास असल्याशिवाय प्राप्त होत नाही. अज्ञान, संकट, अडचण, समस्या, अपयश अशा प्रसंगी श्रद्धा असलेल्या शक्तिची आपण आठवण करतो. त्यांचे संस्कार, त्यांनी दिलेले ज्ञान, मार्गदर्शन, आयुष्यभर शिदोरी बनून भूक भागवतात. त्यांचे स्मरण रोज होत नसले तरीही, त्यांच्या पाऊलखुणा आपल्याला ध्येयाप्रत जाण्याची दिशा दाखवतात. त्या श्रद्धा, विश्वास आणि शक्तिला गुरु हेच नाव..! कोणत्याही रुपात का असेना, बालपणी आई! जी आपल्याला संस्काराचे धडे देते, 'आई माझा गुरु। आई कल्पतरु। कृपेचा सागरू आई माझा' पाळण्याची दोरी हालवत, जगाचा उद्धार करण्याची किमया ती करु शकते, म्हणून आई, पहिला गुरु..! त्यानंतर शिक्षक, गुरु! जे सुयोग्य मार्गदर्शन करून ज्ञानाचे महत्व पटवून देतात. 'ज्ञानार्जन करून मोठे व्हा' असा आशीर्वाद देणारेही शिक्षकच.. याचा अर्थ असा नव्हे की, ज्ञानार्जनाचा मार्ग केवळ गुरुपुरता सीमित आहे. पण याचा अर्थ असाही नाही की गुरु कालबाह्य झाला आहे? त्याचे महत्व विज्ञान युगात राहिले नाही? माणसाला कोणतीही विद्या शिकावयाची असेना का, त्यासाठी कोणी ना कोणी शिकविणारा आवश्यक असतोच. दुसऱ्याकडून कुठलीच मदत न घेता स्वतंत्रपणे काही शिकू गेल्यास ते शिकता येते, परंतु त्यास विलंब लागतो. पुष्कळ परिश्रम करावे लागतात. त्रास भोगावा लागतो. कोणतीही विद्या शिकण्याचा मार्ग हाच की आपल्या पूर्वीच्या लोकांनी त्या दिशेने जेवढे ज्ञान संपादन केले तेवढे आधी आत्मसात करून घ्यावयाचे नि मग त्याच्या पलीकडे अधिक काही मिळवायचे झाल्यास त्यासाठी प्रयत्नशील असणे आवश्यक असते.. ज्ञानेश्वरीच्या अठराव्या अध्यायातील ओवी संत ज्ञानेश्वर माऊलीनी दृष्टांत म्हणून सांगितली आहे. परंतु ज्ञानेश्वर महाराजांच्या वाङ्मयाचे वैशिष्ट्यच असे, की त्यांनी दिलेला दृष्टांतसुद्धा सिद्धांत असतो. वरील ओवी म्हणजे देखील एक महत्त्वाचा सिद्धांतच आहे. आज गुरुपौर्णिमा हा दिवस सर्वच क्षेत्रात आपणास ज्ञानदान करणाऱ्या गुरुबद्दलची आपली आदराची भावना व्यक्त करण्याचा दिवस आहे. प्रकाश हा ज्ञानाचे तर अंधःकार हे अज्ञानाचे प्रतीक आहे, याप्रमाणे गुरुपूजा ही ज्ञानपूजा आहे. यासाठी ज्ञानप्राप्ती करणे म्हणजे गुरुपूजा करणे होय.

आपण ज्यांच्याकडून विद्या प्राप्त करतो, तिच्या बळावर आपले कुटुंब, समाज आणि राष्ट्राचा उद्धार करतो, अशा गुरुचा मान राखणे, त्यांच्याविषयी पुज्यभाव ठेवणे, कृतज्ञता व्यक्त करणे हे आपले परम् कर्तव्य होय. आजच्या दिवशी गुरुला भेटून वंदन करावे. त्यांचा शुभार्शिवाद घ्यावा.. प्राचीन काळी गुरुकुल पद्धतीत आषाढी पौर्णिमेची गुरुपूजा आटोपल्यानंतर दुसऱ्या दिवशीपासुन शिक्षणाला सुरुवात होत असे. बदलत्या संदर्भात शाळा-शाळतून गुरुपूजा व्हावी. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या शाळेची उज्वल परंपरा, कर्तव्याची जाणीव, आपली थोर संस्कृती आणि तेजस्वी इतिहास यांची ओळख करून देऊन आपण त्याचे वारसदार आणि नवभारताचे शिल्पकार असल्याने मार्गदर्शन करावे. दुसऱ्या दिवशी त्या दृष्टीने अध्यापन अध्ययनाला प्रारंभ व्हावा म्हणजे गुरुपूजा सार्थकी लागेल..!! ■ ■

डॉ. संजय भक्ते

# वर्षावासाचे बौद्धधम्मातील महत्व



तथागत भगवान गौतम बुद्धांचा आयुष्यात आलेल्या, प्रत्येक पौर्णिमेचे एक असाधारण महत्व आहे. बौद्ध लोकांसाठी तर एक सण उत्सव आहे. चित्त शुद्ध करण्याचा, आत्मपरीक्षण करण्याचा काल आहे. तथागत गौतम बुद्धांनी आपल्याला मानव धर्म (धम्म) दिला अज्ञानाकडून ज्ञानाकडे नेले. वैज्ञानिक दृष्टीकोन दिला. दुःखाचे मूळ सांगितले. आषाढ पौर्णिमेचे महत्व असे की, तथागत भगवान गौतम बुद्धानी सारनाथ या ठिकाणी, पहिले धम्मचक्र प्रवर्तन करून, आपल्या पाच शिष्यांना प्रथम धम्मोपदेश दिला. त्यामुळे या पाच शिष्यांनी तथागत भगवान बुद्धांना आपले गुरु मानले. त्यामुळे या आषाढ पौर्णिमला गुरुपौर्णिमा म्हणतात. जगभर गुरुपौर्णिमा मोठ्या उस्तवाचा रूपात साजरी केली जाते. सुरवात ही तथागत भगवान बुद्धाना गुरु म्हणून स्विकार केला. तो आषाढ पौर्णिमेचा दिवस होता. त्यामुळे त्याला आषाढ गुरुपौर्णिमा म्हणतात. म्हणजेच प्रत्येक शिष्याने गुरुचा आदर करून त्यांचा मार्गाने चालणे. तसेच वर्षावास म्हणजे काय? मित्रहो आषाढ पौर्णिमेपासून ते पुढे येणाऱ्या अश्विन पौर्णिमेपर्यंत, तीन महिने बौद्ध भिक्खू आणि भिक्खूनी यांचा वर्षावासाचा कालावधी असतो. बौद्ध धम्मात वर्षावासाचे खूप महत्त्व आहे. याची सुरवात बुद्धत्व प्राप्तिनंतर तथागत भगवान बुद्ध यांनी केली आहे. वर्षा म्हणजे पाऊस आणि वास म्हणजे निवास. वर्षावासाचा तीन महिने बौद्ध भिक्खू संघ विहारात, चैत्यविहारात राहून बौद्ध धम्माचा बारीक सारीक गोष्टीचा अभ्यास, मनन आणि पठण करतात. आषाढ पौर्णिमेला वर्षावास सुरू होतो आणि अश्विन पोर्णिमेला संपतो. बुद्धांचा काळात, तथागत भगवान गौतम बुद्धानी सर्व भिक्खुंना चारही दिशांना जाऊन धम्माचा प्रचार-प्रसार करण्याचे आदेश दिले आणि सर्व बौद्ध भिक्खू या कार्यात गुंतले. परंतु हे कार्य करत असताना त्यांना अनेक समस्यांना तोंड ध्यावे लागले. विशेषतः पावसाळ्यात नद्यांना पूर आल्याने हे बौद्ध भिक्खु वाहून जायचे आणि त्यांचा चालण्याने पिकाचे शेतातील नुकसान व्हायचे. विषारी प्राण्यांपासून ईजा व्हायची, म्हणून त्यांनी हे तथागत भगवान गौतम बुद्धाना सांगितले. तथागत भगवान बुद्धांनी आषाढ पौर्णिमेपासून ते अश्विन पौर्णिमेपर्यंत, पावसाळ्याच्या काळात सर्व भिक्खूनी एकाच ठिकाणी रहावे, गावाकडे भिक्षेसाठी आणि धम्म उपदेशासाठी जावू नये. एकाच ठिकाणी राहून धम्माचा अध्ययन, मनन करून प्रसार प्रचार करा आदेश दिला.

तसेच आवश्यक असल्यास, भिक्खू आपल्या वरिष्ठ भिक्खू कडून, परवानगी घेऊन जास्तीत जास्त एक आठवड्यासाठी विहारातून बाहेर जाऊ शकत होते. हा वर्षावास बुद्धाचा काळापासून अस्तितवात आहे.

तथागत भगवान गौतम बुद्धांनी आपला पहिला वर्षावास सारनाथ येथे केला होता. त्या नंतर त्यांनी आपला 45 वा वर्षावास ही याच ठिकाणी केला होता. श्रीव्सती, जेतवन, वैशाली, राजगृह इत्यादी ठिकाणी ही तथागत गौतम बुद्धांचा वर्षावास झाला. वर्षावास म्हणजे तथागत भगवान गौतम बुद्धांचा धम्म म्हणजेच निसर्गाचे नियम पाळणे होय. पुढे चक्रवर्ती सम्राट अशोक यांनी लेण्यांची, चैत्यस्तूप यांची निर्मिती केली आणि भिकू संघास दान दिली. त्यानंतरचे सातवाहन राज्यांनी हि बौद्ध लेण्या, चैत्यस्तूप बांधून भिक्खू संघास दान केल्या. लेण्यांमध्ये भिक्खूंचा निवास, वर्षावास हजारो वर्षे होत होता. बुद्धांचा मानवतावादी आणि विज्ञानवादी धम्म आहे. त्रिसरण, पंचशील यांचे पालन करून बुद्धांचा धम्म आचरणात आणने. आपल्या अशुद्ध चित्त शुद्ध करण्याचा हा काळ आहे. या तीन महीने उपासक, उपासिका शिलाचे पालन करतात. तथागत भगवान गौतम बुद्ध यांचा प्रति आदरभाव, प्रेम व्यक्त करून शरण जातात. ■ ■

राकेश सदानंद पवार
मो. 9867355724

# यात्रा-मेळे आजची परिस्थिती-सच्चा वारकरी !

'शेतात कामाले एक नाही सार पांडुरंग पाहीलं असं बुवा सांगते. शेत पिकलं नाही म्हणून शेतकरी गळफास घेते.' सावता महाराजांना वारीत जाणारे विचारायाचे, तुम्ही पंढरपूरजवळ राहून पंढरपूरला येत नाही. ते म्हणायचे, 'कांदा, मुळा, भाजी, अवघी विठाई माझी' संतांनी श्रमात, कर्तव्यात देव पाहला. वृद्ध जातात ते आनंद घेतात वारीचा. थकते शरीर खुप कष्ट केले त्यांनी त्यांची वारी, त्यांच पंढरपूरला जाणे आपण समजू शकतो. ते ज्ञानोबा-तुकारामाच्या गजरात रमतात. पण शेती हंगाम सोडून जाणाऱ्यांचे काय? राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ग्रामगीतेत लिहितात :-

*पंढरीपासून सहा कोसावरि । सावता राहिला जन्मभरि ।*
*देव मिळविला न करिता वारी । गावीच त्याने ॥55॥ जनता-*
*जनार्दनाच्या सेवेचे । काम करिता इमाने साचे ।*
*गावीच पुण्य पंढरीचे । धाव घेई आपैसे ॥56॥*

सावता महाराज पंढरपुरापासून सहा कोसावर राहायचे. त्यांच्या शेतापासून अनेक दिंड्यांचे मार्गक्रमण व्हायचे. सदभक्त विचारायचे, 'आपण आमची मनोभावे सेवा करता. पण पंढरीला पांडुरंगाच्या दर्शनाला का येत नाही?' सावता महाराज आपल्या शेतीतील कामात रमायचे, 'माझ्या श्रमातून निर्माण होणाऱ्या कांदा, मुळा, भाजी यातच माझ्या पांडुरंगाच दर्शन आहे.' सर्वच पुरोगामी विचारांच्या संतांनी श्रमप्रतिष्ठेला महत्व दिले. यातच त्यांची भक्ती सामवली होती. पण भक्तीचे अवडंबर माजवणाऱ्यांनी संतांच्या नावांनी चमत्कारी कथा रचत भक्तीची वेगळीच नशा जनमाणसात पेरली. त्यातून अध्यात्मिक मेळावे त्यांच्या जाहिराती दुःखी-कष्टी समाज त्यात फसतो. पैशाची लुट तर होते. पण देवदर्शनात गर्दीच्या बेशिस्तीतून चेंगराचेंगरीचे प्रकार घडून मानवी संहार पाहावा लागतो.वारकरीचा खरा अर्थ राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ग्रामगीतेत सांगतात :-

*आपुले वारकरी भाविक । तेचि वारकर्ते पाईक ।*
*करोनि दृष्टांसि लाविला धाक । शिवाजीच जणु सर्वही॥*

अन्याय, अत्याचार, दुराचारा विरूद्ध जो लढतो तो खरा वारकरी. जगतगुरू संत तुकारामांच्या किर्तनातून मावळ्यांना युद्धकलेचे शिक्षण मिळायचे. 'ज्ञानोबा- तुकाराम' हा गजर करतांना टाळकरी नाचतात, ते पवित्रे भाला आणि तलवार चालविण्याचे हातवारे आहे. भक्तीमार्गातून गनिमीकावा करीत युद्धकौशल्य वारकऱ्यांमध्ये घडविण्याचे काम वारकरी संतांनी केले. तुकारामांच्या कीर्तनातील टाळकरी, शिवाजीचे मावळे बनून लढत असावेत. म्हणजेच वारकरी संतांनी सामाजिक अंधश्रद्धा अंधरूढ्यांविरूद्ध लढत आत्मसंरक्षणाचे ज्ञान लोकांना दिले.

टाळ हे भक्ती मार्गातील वाद्यच नाही तर शत्रूशी युद्ध करतांना टाळक्यात हाणायचे पण काम करायचे. बलशाली समाज कोणावर आत्मनिर्भर न राहता स्वावलंबी बनावा हीच भागवत धर्मातील वारकरी परंपरा असावी. असे वारकरी संतांच्या अभंगाच्या अभ्यासाअंती कळते. आनंदी जीवनाचा विचार त्यातून मिळतो.

पण सध्याचा काळ, लोक मनोरंजनालाच आनंद समजतात. संतांनी सुरू केलेले अथवा त्यांच्या नावाने सुरू झालेले यात्रा-मेळे मनोरंजनात अडकतांना दिसतात. संत-महापुरूषांचे विचार ग्रंथात बंदिस्त होत ग्रंथपुजेचे स्तोम माजत आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ग्रामगीतेत यात्रा-मेळे अध्यायात यात्रेत कशाला जावे हे सांगतात :-



*यात्रेस जावे तरि सेवेसाठी । विचारस्फूर्ति आणाया गाठी।*
*तेणे गाव करावे उठाउठी । यात्रारूप आपुले ॥51॥*

यात्रेमध्ये ज्ञानप्रबेधनाचे मेळावे होतात. त्यातून ज्ञानार्जन घेऊन त्याचा उपयोग आपले गाव आदर्श करण्यासाठी व्हावा. आपले गावच *तिर्थाइतके पवित्र बनावे.परंतु यात्रा करती चारोधाम । लोंकां मागती न करता काम ।*
*यात न घडे पुण्यकर्म । वाउगा श्रम, अहंकार ॥52॥*

मित्रांनो, यात्रा या प्रबोधनासाठी असतात. माणूस हा अनेक विकृतीने ग्रासला आहे. राग, लोभ, द्वेषाने पछाडला आहे. शिक्षणाने माणूस प्रगत होतो असे म्हणतात. पण आज शिक्षितच भ्रष्टाचारी बनून पैशासाठी, धनासाठी राष्ट्राशी, मानवीमूल्यांशी बेईमान होतांना दिसतो आहे. चारित्र्यावर गप्पा करणारे चारित्र्यहिनतेने वागत आहे. अध्यात्माच्या नावावर भरणारे मेळे श्रीमंतीचे प्रदर्शन करीत लोकसमुहात संभ्रम निर्माण करीत आहे. माणसाला कळते सारे, पण तो स्वार्थबुद्धीने पछाडला आहे. अध्यात्म खऱ्या अर्थाने अंतर्मनाचे चिंतन करायला शिकवते, पण आज आम्ही भौतिक सुखात अडकत आमची माणुसकीच विसरत आहोत. बोलता खुप येते, लिहिता पण खुप येते, पण जगता येत नाही. यात्रा-मेळे मानवीमूल्य जपत मानवीमूल्य जगण्याची प्रेरणा देणारे असावेत. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सांगतात-

*गावी उपाशी ठेवोनि बाळा । जावे कासया कुंभमेळा? ।*
*देव गावी थोडा, तिर्थी निराळा । ऐसे नाही ॥53॥*

राष्ट्रसंतांनी भक्तीचे प्रदर्शन करणाऱ्यांचे कान टोचले. आपले कुटुंब ज्याच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी आपल्यावर आहे. आपले कर्तव्य सर्वप्रथम आपण पूर्ण करावे.

*नच जाई पुण्यधामा, बस रे ! करीत कामा।*
*कामात लक्ष रामा- वरी, ठेव अंतरीचे॥*
*हरिनाम घे फुकाचे, जप मानवा! तू वाचे ।*
*तुटतील बंध सारे, भव-पाश या जीवाचे ॥*

**'प्रथम संसार करावा नेटका, राहु नये तो फाटका'** संत परंपरेने दिलेला विचार ज्यांच्या जगण्यात असतो तोच खरा भक्तीवान वारकरी असतो. आज यात्रा-मेळे यामधील तरूणाई हा चिंतेचा विषय आहे. आज श्रमप्रतिष्ठा रसातळाला जात आहे. रोजगार नाही ही ओरड शिक्षणाच्या डिग्र्यांशी आम्ही जोडतो आहे. शेतीपासून तर अनेक लहान उद्योग श्रम करणारे नाहीत म्हणून बंद पडत आहे. श्रमप्रतिष्ठा वाढेल त्यातूनच भारत विश्वगुरू बनू शकेल. मागणारे हात हे निर्मिती करू शकत नाही. कारण ते स्वावलंबी नसतात. पाहा हे सारे पटते का? करा चिंतन! ■ ■

**जनक्रांतीच्या पाऊलवाटा**



ज्ञानेश्वर दुर्गादास रक्षक
मो. 9823966282

# भारत देशातील व्यवस्था कोणाच्या हिताची?



देशातून इंग्रज गेल्यानंतर येथील रहिवासीना स्वातंत्र्य मिळून प्रत्येकाची गरज. पूर्ण होऊन समाधानाने जीवन जगेल ही आशा होती. सर्वांना शिक्षण आरोग्याच्या सोयी उपलब्ध होतील. आज चित्र काय दिसते, मूठभर लोक संपत्तीचे मालक असून तेच चैनीचे जीवन जगून सर्व सुखसोयीचा उपभोग घेत आहे.

बहुतांश लोकांना दोन वेळेचे जेवण सुद्धा मिळणे कठीण झाले आहे. शिक्षणाची मक्तेदारी झाली असून काहीच लोक शिक्षणाचा कायदा घेऊन शासन प्रशासनावर कब्जा केला आहे.

भारतीय राज्यघटना समाजाच्या हितासाठी संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. परंतु समाज कल्याणाच्या योजना दुसरीकडे वळवून त्याचा लाभ दुसऱ्यांनाच दिला जातो. ज्या वर्गासाठी निधी राखून ठेवला आहे, त्याला जाणिवच नाही. म्हणून त्यापासून अलिप्त राहतो. त्यांच्या वतीने आवाज उठवून सरकारवर दबाव निर्माण करून लाभार्थीपर्यंत पोहचवण्याची यंत्रणा नसल्यामुळे त्या योजनांचा लाभ दुसऱ्यांना होत असतो.

समाजात गरीबी मोठ्या प्रमाणात वाढत आहे. भूकमरी बेकारी प्रचंड प्रमाणात वाढत आहे. शिक्षण काहीच्या घरीच पाणी भरत आहे. विषमतासारखी वाढत आहे. सामाजिक प्रश्न जटील होत आहे.

येथील प्रस्थापित राजकिय पक्ष सत्तेच्या संघर्षात व्यस्त आहेत. निवडणूक आली तर गरीबांच्या घरी जाऊन पाया पडायच्या, काही पैसे देऊन मत विकत घ्यायचे व सत्ता भोगायची ही सत्ताधारी व विरोधीपक्षाची निती आहे. त्यामुळे समाजात विषमतेची दरी सारखी वाढत आहे.

स्वातंत्र्याची 75 वर्ष पूर्ण होत आहे. परंतु मोठ्या प्रमाणात लोकसंख्या ही गरीबीत, अज्ञानात, अंधश्रद्धात जगत आहे. या विषमतावादी व्यवस्था विरूद्ध लढणारी संघर्ष करणारी विचारधारावर आधारित संघटना कमजोर असून प्रभावहीन आहेत. आज गरज आहे सामाजिक, राजकिय, विषमतावादी व्यवस्था विरूद्ध लढणारी संघटना मजबूत होऊन सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी संघर्ष करेल. येथील भांडवलवादी, शोषणवादी, सामाजिक विषमतावादी व्यवस्था विरूद्ध जन लढे उभारणे आवश्यक आहे. तरच येथील प्रस्थापित व्यवस्थेला धक्का बसून सर्वांना समान न्याय, समान संधी मिळून मुख्य प्रवाहात सामील होण्याची संधी मिळेल. ■ ■



विनायकराव जामगडे
मो.9372456389

“ आदर दिला तरच आपली मूल्ये आणि संस्कार टिकून राहतात... ”



# शोषणाच्या पाठी गुरुत्वाच्या गाठी

**उच्चवर्णीयांकडून भारतीय बहुजनांचे अमर्याद शोषण करणारी सर्वोत्कृष्ट भटी यंत्रणा म्हणजे गुरु शिष्य परंपरा होय. ज्ञानाचे केंद्रीकरण हाच गुरुत्वाचा गाभा असून एकांतात कानामध्ये मंत्रोपदेश करणारे कानफुके गुरु ही भारतीय जनमानसाचे दीर्घकालीन शोषण व्यवस्थेची ‘मास्टर की’ असल्याचे आपणास पदोपदी प्रत्येयास येते. याचे बटबटीत उदाहरण म्हणजे कर्णाला परशुरामाने दिलेले ज्ञान हे शाप देऊन विफल करता येते आणि द्रोणाचार्यांला गुरुदक्षिणेच्या रूपात एकलव्याचा अंगठा कापून घेता येतो. वरील दोन उदाहरणावरून गुरु शिष्य परंपरा हे इथल्या बहुजन समाजावर प्रभुत्व गाजवणारे आणि इथल्या ब्राह्मणी व्यवस्थेने बहुजनांवर उगारलेले एक हुकमी हत्यार होय. यात किंचितही शंका घेण्यास वाव नाही.**

गुरुकडे काहीतरी अगाध, अनंत आणि अद्भुत अशा पद्धतीचे ज्ञान आहे. गुरुला जो प्रसन्न करील त्याला गुरु आपल्याजवळ असलेले ज्ञान संक्रमित करतो अशी कंडी पिकवणाऱ्या भ्रामक कथा वेगवेगळ्या पोथ्या लिहून ब्राह्मणी साहित्यिकांनी जनमानसात पेरल्या. परिणामी सारा बहुजन समाज आपले सत्व आणि आपले स्वत्व हरवून बसला. भिऊ नको या शब्दानेच भीती घातली आहे. भीतीचे कारण नष्ट केले तर पाठीशी राहण्याचा प्रश्नच उरत नाही. असे तथाकथित गुरु किंवा स्वामी पहेलगामच्या हल्ल्यात निष्पाप भारतीयांच्या पाठीशी का उभे राहिले नाही हा प्रश्न तुम्हा आम्हा सर्वांना पडला पाहिजे. साधारणतः ही गुरु शिष्य परंपरा वारकरी संप्रदायाच्या संतांपर्यंत अबाधित असल्याचे आपल्याला दिसून येते. या गुरु शिष्य परंपरेला सुरुंग जर कोणी लावला असेल तर तो वारकरी संप्रदायाच्या संतांनी लावलेला आहे. तत्कालीन मुसलमान राज्यव्यवस्था सुद्धा याला कारणीभूत आहे. स्वामी विवेकानंद असे म्हणतात, मुसलमानाच्या राजवटीचे योगदान हे की दलितांची आणि गरिबांची परिस्थिती सुधारली आणि विशेष अधिकार संपले. याची खंत रामदासाने आपल्या पुढील श्लोकात लिहून ठेवलेली आहे. ‘राज्य गेले म्लेंच्छ केत्री गुरुत्व गेले कुपात्री आपण अरत्री ना परत्री काहीच नाही’ रामदासांच्या वरील ओळीला स्वामी विवेकानंदांनी दुजोरा दिला आहे. भारताचा भावी काळ या निबंधात स्वामी विवेकानंद लिहितात. मोघलांच्या दरबारात जे बौद्धिक वैभव होते त्याचा अंश देखील पुण्याच्या आणि लाहोरच्या दरबारात दिसत नाही. रामदासांनी म्हटल्याप्रमाणे मुसलमान राज्यकर्त्यांनी ब्राह्मणाचे विशेष अधिकार संपवले. त्यामुळे गुरुत्व गेले कुपात्री अर्थात जगद्गुरु संत श्रेष्ठ तुकाराम महाराजांसारख्या संतांना शूद्र असून बहिणाबाई नावाच्या वारकरी संप्रदायातील संत कवी गुरुस्थानी मानत उच्चवर्णीय असून तुकारामाचे शिष्यत्व पत्करणे हे रामदासाप्रमाणे तत्कालीन सनातन्यांना पटले नाही. पुढे मुंबाजींनी बहिणाबाईचा खूप छळ केला. निवृत्तीनाथ हे वारकरी संप्रदायातील शेवटचे गुरु. त्यानंतर गुरु हा शब्द राहिला. पण त्याचे वजन, त्याचे गुढतेचे वलय आणि विशेषाधिकाराचे लचांड निघून गेले. गुरुने कानमंत्र द्यायचा अर्थात कानफुक्या परंपरेचा अस्त झाला.



सिलेक्टिव्ह शिष्याला मंत्र देणे या परंपरेला वारकरी संप्रदायाच्या संतांनी जोरदार विरोध केला. ‘फोडीले भंडार धन्याचा हा माल’ अशी जोरदार गर्जना करत त्यांनी ज्ञान भंडार हे सर्वांसाठी खुले केले. अध्यात्म म्हणजे काहीतरी गुढ अद्भुत ही भावना जाऊन तो एक जीवनक्रम बनला. ‘मेघवृष्टीने करावा उपदेश परी गुरुने न करावा शिष्य’ मेघवृष्टीचे वैशिष्ट्य म्हणजे जमिनीच्या मगदूराप्रमाणे किंवा आवडीनिवडीप्रमाणे पर्जन्यवृष्टी होत नसून ‘नाही विचारीत । मेघ हागणदारी शेत’ या तुकोक्ती नुसार ती सर्वत्र होते. जमिनीचा जसा कस असेल तसे पीक येते. ‘पर्जन्य पडावे आपल्या स्वभावे आपापल्या दैवी पिके भूमी’ जसा वर्षा हा मेघांचा स्वभाव आहे, तसा उपदेश करणे हा आपला स्वभाव व्हावा. दुसऱ्या बाजूने शिष्याला राबवून घेणे ही आजपर्यंतची रुढी तुकोबा उलटी करतात. ‘शिष्याची जो नेघे सेवा मानी देवासारखे’. एवढेच नाही ‘एक करिती गुरुगुरु भोवता भारु शिष्याचा । पुंस नाही पाय चारी मनुष्य परी कुतरी’ ती अशाप्रकारे जे स्वतःला गुरु म्हणवून घेत गुरगुर करतात, त्यांना तुकोबांनी कुत्र्याची उपमा दिलेली आहे. गुरुत्वाच्या गाठी म्हणजे गुरुत्वाला चिटकवलेले गुढ आणि रहस्य अशाप्रकारे वारकरी संप्रदायाच्या संतांनी उकलून जनसामान्यांच्या समोर ठेवले. त्यामुळे बहुजन समाजाचे हजारो वर्षापासून होत असलेले शोषण थांबले. परंतु अलीकडे मात्र गुरु पूजेचे मोठे उत्सव सर्वत्र साजरे होत असताना संत विचारांचा विसर बहुजन समाजाला पडलेला दिसतो. फसव्या तथाकथित गुरुत्वाने मेंदूचा पूर्ण ताबा घेतला असून गुरुला सर्वस्व समर्पित करण्यासाठी सर्वत्र रांगा लागलेल्या दिसतात. अशा पोषक वातावरणात शिष्यवर्गाचे शोषण आणि फसवणूक सहज शक्य असून हे शोषण शिष्यांच्या बायकांच्या प्रथमोपभोगांच्या विशेष अधिकारापर्यंत जाते. गुरुने बायको मागितली तर दिली पाहिजे, असे एकेकाळी आपल्या भारत देशातील सगळ्यात मोठा आध्यात्मिक गुरु आसाराम बापू आपल्या पुस्तकात लिहून ठेवतो. हे पुस्तकापुरते मर्यादित नसून विविध प्रसंगी गुरुला वयात आलेल्या आपल्या मुली स्वतः सोपवणाऱ्या सश्रद्ध शिष्या आणि गुरुला आपली बायको बंगला आणि गाडी समर्पित करून विरक्त जीवन जगणारे शिष्य हे सर्वश्रूत आहे आणि म्हणून गुरु शिष्य ही परंपरा अधोगतीच्या मार्गाने नेणारी आहे हाच संतांचा निर्वाळा. ■ ■



हेमंत टाले
मो. 9975807632

## कोण आहेस तु ?

### अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

काही लोकांमध्ये ‘मी’ पणाची भावना अगदी ठासून भरलेली असते. पण कोणत्याही व्यक्तीने कधीही ह्याचा विसर पडू देऊ नये की माझे म्हणावे असे आपल्याजवळ फार काही नसते. मायबापांमुळे आपल्याला हे सुंदर जग बघता आले . आपल्याला मिळालेले नाव हे आईवडील किंवा नातेवाईकांनी दिलेले असते. पालनपोषण देखील कुणीतरी केलेले असते. गुरूजनांमुळे शिक्षण मिळते. नोकरी असो की ऊद्योगधंदा हा ही दुसऱ्यांच्या भरवशावर चालतो. पद, पैसा, प्रतिष्ठा अन् प्रसिद्धी ही सुध्दा ईतरांचीच देण आहे. आपल्यापोटी जन्माला येणाऱ्या लेकरांमुळेच आपण मायबाप बनतो. सुख, दुःखात ईतर मंडळीच सहभागी होत असते. एकटी व्यक्ती काहीही करू शकत नाही. नवसाला पावण्यासाठी देव, आजारपणात डॉक्टर तसेच दैनंदिन जिवनात कुणाचा ना कुणाचा आधार हा घ्यावाच लागतो. हा निसर्गसुध्दा आपल्याला सतत काहीतरी देत राहतो. आपल्याला घातली जाणारी पहीली अन् शेवटची अंधोळही दुसरेच घालतात. शेवटी स्मशानातही आपल्याला ईतरांच्याच खांद्यावर जावे लागते. आपल्या मृत्युनंतर आपण कमावलेली संपत्तीही दुसऱ्या व्यक्ती वाटून घेतात. ही वस्तुस्थिती माहीत असूनही माणूस ‘मी’पणा का बरे सोडत नसावा ? ■ ■

# वनस्पती विज्ञानातील नवी भोंदूगिरी !

*झाडांना, वनस्पतींना संगीत ऐकवा..*
*झाडांना, वनस्पतींना मंत्र ऐकवा..*
***म्हणजे, झाडे, वनस्पती, भरभरून वाढतील आणि उत्तम पीक देतील..***
*ही वनस्पती विज्ञानातील नवी भोंदूगिरी आहे!!*




गुरु वास्तवात कुठल्याही गोष्टीचा अर्थ लावायचा म्हटले तर मानवाला जसा मेंदू आहे तसे मेंदूचे सर्व भाग वनस्पतीमध्ये असायला हवेत. पण कोणत्याही वनस्पतीमध्ये मेंदू तर सोडाच पण मज्जासंस्था किंवा नर्व्हस सिस्टीम देखील नसते. त्यामुळे तुम्ही मंत्र म्हणा.. आरडाओरडा करा.. नाहीतर कुठलेही गाणे ऐकवा.. संगीत ऐकवा.. ते त्या वनस्पतींना कसे कळेल? मंत्रवाल्यांच्या धर्मातील लोकांनाच संस्कृतचा अर्थ मेंदू असून कळत नाही तिथे वनस्पतींची काय बात? वनस्पतींना जाणीव असतात असा दावा केला जातो. वास्तवात हा दावा दिशाभूलचा आहे. बॅक्स्टर नावाच्या एका कथित संशोधकाने याची सुरुवात केली होती. त्यानंतर, 2006 मध्ये, ई. डी. ब्रेनर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ‘ट्रेंड्स इन प्लांट सायन्स’ या मुख्य प्रवाहातील जर्नलमध्ये ‘प्लांट न्यूरोबायोलॉजी-एन इंटिग्रेटेड व्ह्यू ऑफ प्लांट सिग्नलिंग’ या शीर्षकाचा एक वादग्रस्त लेख प्रकाशित केला. तेव्हापासून, ‘वनस्पती विचार करतात आणि अनुभवतात’ ही अवास्तव कल्पना एक लहान कॉटेज उद्योग बनली आहे, जी पॉडकास्ट, यूट्यूब व्हिडिओ आणि यासारख्या गोष्टींद्वारे सामान्य लोकांच्या चर्चेत पसरली आहे आणि अंधश्रद्धा निर्माण करत बसली आहे!

> **एक साधी गोष्ट यामध्ये विसरली जाते. समजा झाडांना आपण मंत्र पुटपुटून ‘ऐकवले’ तर झाडांना कान असतात का? असा साधा प्रश्न या मंत्रवाल्यांना आणि मंत्रवाल्या राजकारण्यांना पडत नाही. कारण ते विज्ञानातले ‘ढ’ लोक आहेत! वनस्पतींना मंत्र ऐकवल्यानंतर त्या मंत्रांचा अर्थ कळण्यासाठी त्यांना मेंदू हवा. ‘वनस्पतींना मेंदू असतो’ हे या मंत्रावाल्यांच्या मेंदूतून निघालेली अफलातून बिनडोक कल्पना आहे.**

वनस्पती सक्रिय वर्तन दाखवत नाहीत. वनस्पतींमधील विद्युत सिग्नल आणि प्राण्यांच्या मज्जासंस्थेमधील विद्युत सिग्नल यांच्यात लक्षणीय फरक कार्यात्मक दृष्ट्या आहे. (वनस्पतींमध्ये Ca 2+ सिग्नलिंग आणि ऑस्मोटिक नियंत्रण यांचा समावेश असतो.) वनस्पतीमध्ये विद्युत निर्माण होते कारण त्यांच्या पेशी मध्ये हायड्रोजन प्लस हे रसायन काम करते आणि मानवामध्ये हेच काम सोडियम प्लस हे रसायन काम करते. दोन्हींमध्ये असलेला हा फरक एवढाच नाही तर या विद्युत चेतनेमुळे जे बदल घडतात ते वनस्पतीमध्ये केवळ रासायनिक बदलांमुळे घडतात तर मानवामध्ये मेंदू व नर्व्हस सिस्टीम असते त्यामुळे घडतात. म्हणूनच मानवाला भाषा आणि परिस्थिती यांचे आकलन होते. ज्याला कॉग्निशन असे म्हणतात. असे कॉग्निशन मेंदू नसल्यामुळे वनस्पतींमध्ये होत नाही. म्हणूनच वनस्पतींना संगीत ऐकवले तरी त्याचा अर्थ त्यांना काही कळणार नाही आणि मंत्र पुटपुटले तरी ते शब्द त्यांना समजणार नाहीत. मानवात एखादी भाषा शिकायला शाळेला जावे लागते किंवा सतत भाषेच्या संपर्कात राहावे लागते. वनस्पती अशी भाषा शिकत नाहीत. त्यामुळे त्यांना मंत्राचे सामर्थ्य वगैरे कळणे शक्य नाही. याशिवाय जेव्हा वनस्पतींमध्ये व प्राण्यांमध्ये ऊर्जा निर्माण होते तेव्हा त्या ऊर्जांची मोजणी देखील केली तर ती भिन्न येते. ज्याला नर्नस्ट प्लांक ईक्वेशन म्हणतात.

जर एखाद्या माहितीचे रूपांतर अर्थामध्ये करावयाचे असेल तर त्यासाठी विशिष्ट यंत्रणा लागते जी मानवाच्या शरीरात असते. ॲक्शन पोटेन्शियल आणि कॅल्शियम एलेवेशन नावाची रासायनिक यंत्रणा ही माहिती चे रूपांतर या यंत्रणेच्या आधार घेऊन अर्थामध्ये करते. जे वनस्पतींमध्ये नसते. थोडक्यात वनस्पती मधील जैव विद्युत रासायनिक बदल हे कुठलीही कृती किंवा आवाज ‘समजून घेण्यास’ अक्षम ठरतात.

|| डॉ. प्रदीप पाटील ||

वनस्पतींना वेदना जाणवतात किंवा त्या आनंदी होतात या निव्वळ कवी कल्पना आहेत. कारण वेदना किंवा भावना निर्माण होण्यासाठी भावनेची मेंदूतील केंद्रे ही आवश्यक असतात. वनस्पतींमध्ये जेव्हा एखाद्या गोष्टींनी हालचाल होते उदाहरणार्थ, लाजाळूचे झाड, तेव्हा त्यामध्ये ॲक्शन पोटेन्शियल आणि व्हेरिएशन पोटेन्शियल नावाची यंत्रणा काम करत असते आणि वनस्पती मधील फ्लोएम नावाचे जाळे हे काम करते. प्राण्यांमध्ये असलेले मज्जासंस्थेचे जाळे आणि मेंदू हे वनस्पती मध्ये नसल्यामुळे वेदना, जाणीवा, या क्रिया घडत नाहीत.

‘वनस्पती मज्जातंतूशास्त्री’ नावाची नवीन जमात बुद्धिमत्ता, आकलनशक्ती आणि अगदी भावना यासारखे शब्द वाटेल तसे वापरतात, वनस्पती आणि प्राण्यांमधील कथित समानता सतत अधोरेखित करतात. परंतु अशा शब्दांचे विशिष्ट अर्थ असतात - विशेषतः वैज्ञानिक संदर्भात - आणि ते प्राण्यांसाठी वापरलेले अर्थ वनस्पतींना लागू होत नाहीत.

काही वेळा हे मंत्र वाले असा दावा करतात की वनस्पतींचा मेंदू हा वनस्पतींच्या मुळात असतो पण असे कुठेही सिद्ध झालेले नाही. समजा वनस्पतींना सर्व काही समजते असे जर असते तर सर्व वनस्पतींमध्ये विचारांची देवाण-घेवाण झाली असती आणि सर्वांनी एकत्र येऊन हेतूपूर्वक एखादे काम उरकले असते. पण तसे काही दिसत नाही. वनस्पतींच्या वर्तनामध्ये हार्मोन्स आणि पर्यावरणीय रिसेप्टर्सद्वारे अंतर्गत आणि बाह्य सिग्नलिंगचा समावेश असतो. परंतु या यंत्रणा प्राण्यांच्या न्यूरॉन्स, सायनॅप्सेस आणि तत्सम गोष्टींशी साधर्म्यपूर्ण नाहीत. वनस्पती जाणीवेबद्दलच्या मंत्रयुक्त अशा संशयास्पद कल्पना या वैज्ञानिक शाखेला हानी पोहोचवू शकतात. वनस्पती जाणीवेची ही अवास्तव कल्पना केवळ सामान्य लोकांची दिशाभूल करत नाही, तर तरुण, महत्त्वाकांक्षी वनस्पती जीवशास्त्रज्ञांमध्ये वनस्पती विज्ञानाबद्दल चुकीचे विचार निर्माण करू शकते. वनस्पती जाणीवेची ही भन्नाट कल्पना वैज्ञानिक संशोधन नियमनावर परिणाम करू शकते. आणि म्हणूनच अशी कल्पनारम्यता थांबवणे आवश्यक आहे.

हल्ली धार्मिक लोकांना विज्ञानाची मदत घेण्याची उबळ आलेली आहे. कारण वैज्ञानिक परिभाषेत सांगितले की लोकांना ते पटते. त्याचबरोबर राजकारण्यांना धर्माचा वापर करून धर्मातील अनेक कल्पना वैज्ञानिक कशा आहेत हे सांगण्याची घाणेरडी सवय लागलेली आहे. यातून त्यांना सांस्कृतिक वर्चस्व आणि सत्ता ताब्यात ठेवणे हे उद्दिष्ट साध्य करायचे असते आणि अर्थातच हे अत्यंत गलिच्छ राजकारण आहे. यामुळे राष्ट्राचे तर नुकसान होतेच आहे शिवाय सामान्य माणूस भ्रमित होऊन विचित्र वागू लागला आहे. हा देश वेड्यांची धर्मशाळा बनवायला आत्ताच्या राजकारण्यांना आणि धार्मिक वर्चस्ववाद्यांना आता फार काळ लागणार नाही हे मात्र खरे!! ■ ■

# मा. सरन्यायाधीश न्या. भूषण गवई यांचे हार्दिक अभिनंदन...!



महाराष्ट्राच्या विधीमंडळात दि. 8 जुलै, 2025 रोजी भारताचे सरन्यायाधीश न्या. भूषण गवई यांचा सत्कार करण्यात आला. या सत्काराला उत्तर देतांना भारताची राज्यघटना या विषयावर त्यांनी संविधानाचे महत्त्व विषद करणारे अत्यंत भावनिक भाषण केले. या भाषणात त्यांनी महाराष्ट्राच्या मातीला वंदन करून मी महाराष्ट्रात जिथे जिथे काम केले होते तिथे सत्कार स्वीकारणार असे ठरवले होते. खासकरून छत्रपती संभाजीनगर, अमरावती आणि नागपूर हा शेवटचा सत्कार समारंभ आहे. पण आज विधिमंडळात होत असलेल्या सत्काराचे महत्त्व माझ्या मते अनन्यसाधारण असे आहे. कारण या विधीमंडळाच्या इमारतीसोबत माझ्या वडिलांचे तब्बल 30 वर्षाचे प्रेमाचे नाते राहिले आहे. हा फक्त दोन्ही सभागृहांच्या सदस्यांनी केलेला बहुमान नसून महाराष्ट्राच्या 12 कोटी 87 लाख जनतेचा मला मिळालेला आशीर्वाद आहे, असे मी समजतो. त्यामुळे सर्वप्रथम मी महाराष्ट्राच्या जनतेला आणि मातीला वंदन करतो असे अत्यंत भावनिक शब्दात त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. त्यानंतर भारतीय राज्यघटना या विषयावर बोलतांना न्यायमूर्ती भूषण गवई म्हणाले की, व्यक्तींना पदे मिळतात ती सत्ता नसते, जेव्हा संविधानिक पदावर व्यक्ती जातो तेव्हा त्यालाही घटनेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार काम करणे अभिप्रेत असते. आपल्या देशाची राज्यघटना ही या देशात रक्तविरहित क्रांती निर्माण करण्याचे शस्त्र आहे अशा शब्दात त्यांनी संविधानाचे महत्त्व विषद केले. त्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन.

आज देशाच्या संविधानावर वेगवेगळे आक्षेप घेतले जात आहेत. संविधान बदलले पाहिजे असे बोलले जात आहे. संविधान निर्माता व संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधान निर्मितीच्या कार्यावर वादंग निर्माण केले जात आहेत. इतकेच नव्हे तर आमदार, खासदार, मंत्री, उपराष्ट्रपती सारख्या संविधानिक पदावर कार्य करणाऱ्या व्यक्तींसह ज्यांना संविधानातील न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही तत्त्वे मान्य नाहीत अशा लोकांकडून संविधान विरोधी भूमिका घेऊन वेगवेगळी विधाने करून देशात संभ्रमाची परिस्थिती निर्माण केली जात आहे. या पार्श्वभूमीवर सरन्यायाधीश न्या. भूषण गवई यांचे भाषण अत्यंत महत्त्वाचे असून संविधानाची मूल्ये राजकीय लोकांना माहीत व्हावी यादृष्टीने फार मोलाचे आहे.

भारतीय संविधानाचे महत्त्व आणि संविधानात देशाला एकसंघ टिकवून ठेवण्याची असलेली शक्ती लोकांना समजावी यासाठी आपल्या सत्काराच्या व इतर भाषणांमध्ये संविधानावर अभ्यासपूर्ण आणि प्रभावी भाषण करून संवैधानिक जागृती करण्यासाठी प्रयत्न करणारे सरन्यायाधीश मी पहिल्यांदा पाहत आहे.

सरन्यायाधीश न्या. भूषण गवई यांना फार अल्प काळ मिळणार आहे. पण तरीही ते आपल्या कार्यतत्परतेने देशाच्या न्यायव्यवस्थेला खऱ्या अर्थाने संविधानिक मूल्यांवर काम करण्याची दिशा देतील आणि देशात सर्वोच्च न्यायालयात दुर्लक्षित ठेवलेले महत्त्वाचे निर्णय जसे ईव्हीएम, बुद्धगया, निवडणूक वाद, राजकीय महत्त्वाचे निर्णय, महाराष्ट्राच्या निवडणुकीबाबत दाखल याचिका, मराठा आरक्षणाचा प्रलंबित निर्णय यासोबतच ओबीसी, अनुसूचित जाती जमातीच्या आरक्षणातील बॅकलॉग भरण्याबाबत, लोकांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याला अबाधित ठेवण्याचा आणि देशात सर्वांना समान संधी मिळावी, न्यायव्यवस्था व न्यायाधीशांच्या नियुक्ती इत्यादी सारख्या महत्त्वाच्या विषयावर संविधानिक निर्णय घेऊन लोकांचा देशाच्या न्यायव्यवस्थेवरचा विश्वास दृढ करावा हीच देशाच्या सर्वोच्च न्यायालयाच्या संवैधानिक पदावर विराजमान असलेल्या न्या. भूषण गवई यांच्याकडून अपेक्षा आणि त्यासाठी त्यांना पुढील वाटचालीस मनःपूर्वक सदिच्छा. ■ ■

|| प्रा. डॉ. एम. आर. इंगळे ||
मो.9423429060

# क्रांतिकारी इतिहासकार व विचारवंत प्रा. मा.म. देशमुख

विशेष म्हणजे 14 एप्रिल 1984 ला जेव्हा दिल्ली येथे माननीय कांशीरामजी यांनी बहुजन समाज पार्टी या राजकीय पक्षाची स्थापना केली त्या समारंभाला मा. म. हे सुद्धा उपस्थित होते. एवढेच नव्हे तर नागपूर विभाग पदवीधर मतदार संघाची त्याचदरम्यान निवडणूक होऊ घातली होती. त्या निवडणुकीत मा. म. हे बहुजन समाज पक्षाचे अधिकृत उमेदवार होते. म्हणजेच बहुजन समाज पक्षाच्या स्थापनेनंतर या पक्षाच्यावतीने विधान परिषदेची निवडणूक लढणारे मा. म. हे देशातील पहिले उमेदवार होते. पुढे रामटेक लोकसभा मतदारसंघातूनही मा. म. यांनी बसपाचे अधिकृत उमेदवार म्हणून निवडणूक लढविली. याप्रमाणे मा. म. हे बहुजन समाज पक्षाचे नेते तथा वरिष्ठ पदाधिकारी म्हणून नावारूपास आले. बसपाच्या वतीने देशभर चालविण्या जाणाऱ्या विविध लोक जागरण अभियाना अंतर्गत आयोजित अनेक सभा संमेलने आणि मेळाव्यामधून त्यांनी बहुजन समाज पक्षाच्या विचारधारेचा प्रचार आणि प्रसार केला. कांशीरामजी यांच्या नेतृत्वावर त्यांची अढळ श्रद्धा होती. बहुजन समाज पक्ष हा केवळ राजकीय पक्ष किंवा सत्तेसाठी राजकारण करणारा पक्ष नसून ती छत्रपती शिवाजी महाराज, राष्ट्रमाता जिजाऊ, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख, नारायणा गुरु, पेरियार रामास्वामी या बहुजनोद्धारक महापुरुषांची विचारधारा अनुसरणारी चळवळ आहे अशी त्यांची धारणा होती. 1980 नंतर जेव्हा देशात मंडल आयोगाचे आंदोलन उभे झाले तेव्हा ज्या ओबीसी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जाती समूहासाठी मंडल आयोग स्थापन करण्यात आला होता. त्याच मंडल आयोगाविरुद्ध ओबीसी मधील काही सवर्ण जाती रस्त्यावर उतरल्या. हा मंडल आयोग आपल्यासाठी नसून तो पुन्हा अनुसूचित जातींसाठीच आहे असा गैरसमज आणि भ्रम तथाकथित ब्राम्हणवादी आणि प्रस्थापित व्यवस्थेकडून पसरविण्यात आला. त्यामुळे मंडल आयोग म्हणजे काय? हे त्यांना समजावून सांगून त्यांच्यातील मंडल आयोगाबद्दलचा गैरसमज दूर करणे नितांत आवश्यक होते, त्यासाठी मा. म. यांनी जीवापाड मेहनत घेतली. बामसेफ डीएसफोर आणि बीएसपीच्यावतीने भारतभर राबविण्यात आलेल्या मंडल आयोग समर्थनार्थ आंदोलनात आणि सभा संमेलनात मा. म. यांनी हिरिरीने भाग घेतला. दुसरीकडे मा. अण्णासाहेब पाटील यांनी मुंबईत मराठा महासंघ स्थापन करून आरक्षण विरोधी आंदोलन सुरू केले. याच दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या रिडल्स इन हिंदुईझम या ग्रंथाविरुद्ध तथाकथीत हिंदूवाद्यांनी हिंदू देवतांचा अपमान झाल्याचा गवगवा करून आंबेडकरी समाज आणि इतर बहुजन समाजात द्वेशाचे वातावरण निर्माण केले. अण्णासाहेब पाटलांच्या निधनानंतर ॲड. शशिकांत पवार यांचेकडे या मराठा महासंघाची धुरा आली. त्यांनी सुद्धा हाच धागा पकडून आरक्षण आणि रिडल्स इन हिंदुईझम च्या विरोधाची भूमिका घेतली. एवढेच नव्हे तर त्यांनी रिडल्स इन हिंदुईझम हा ग्रंथही जाळला. कर्मधर्म संयोगाने मा. म. देशमुख यांनी सुद्धा या मराठा महासंघाचे सदस्यत्व स्वीकारले होते. तसेच त्यांचा मराठा महासंघाचे अध्यक्ष ॲड. शशिकांत पवार यांचेशीही घनिष्ठ संबंध होता. अशावेळी दलित आणि बहुजन समाजात निर्माण झालेले विद्वेषाचे वातावरण पाहून मा. म. अतिशय व्यथित आणि अस्वस्थ झाले. त्यांनी लगेच मुंबई गाठून ॲड. शशिकांत पवार यांची भेट घेतली. उभयतांमध्ये दीर्घकाळ चाललेल्या चर्चा आणि विचार विनिमयातून मा. म. यांनी ॲड. शशिकांत पवार यांच्या मनात शिरलेले मंडल आयोग आणि रिडल्स इन हिंदूईझम या ग्रंथाबाबतचे गैरसमज नाहीसे केले आणि आश्चर्य म्हणजे ॲड. शशिकांत पवार यांनी तात्काळ निर्णय घेऊन आपली मंडल आयोग तथा रिडल्स इन हिंदुईझम या ग्रंथाविरुद्ध असलेली भूमिका बदलली. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मानवतावादी तथा बहुजनोद्धारक विचारसरणीचा अंगीकार केला. मा. कांशीराम यांच्या बहुजनोद्धारक चळवळीशी नाते जोडले. याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे बसपाचे जिल्हाध्यक्ष आणि आदिवासी समुहाचे क्रांतिकारी विचारवंत तथा लेखक मा. व्यंकटेश आत्राम यांनी लिहिलेल्या ‘गोंडी संस्कृतीचे संदर्भ’ या मौलिक ग्रंथाचे प्रकाशन आर्वी जिल्हा वर्धा येथे ॲड. शशिकांत पवार यांचे हस्ते झाले. या प्रकाशन सोहळ्यास ॲड. शशिकांत पवार यांचेसह प्रा. मा. म. देशमुख बहुजन समाज पक्षाचे तत्कालीन प्रदेशाध्यक्ष स्मृतीशेष श्रीकृष्ण उबाळे आणि बहुजन-आदिवासी तथा आंबेडकरी समाजातील अनेक मान्यवर उपस्थित होते. याप्रमाणे मराठा बहुजन समाज आणि आंबेडकरी समाज यांच्यात निर्माण झालेले वैमनस्य मा. म. यांच्या परिश्रमाने दूर झाले, हे कोणीही अमान्य करू शकणार नाही. मा. म. देशमुख यांनी शब्द टाकला आणि समोरच्यांनी तो नाकारला असे कधीच झाले नाही. असे कारुण्य, प्रज्ञातेज, मैत्री भावना आणि विद्वत प्रचुरता मा. म. देशमुख यांनी अर्जित केलेली होती. पराकोटीचे मतभेद आणि वैमनस्य ऊराशी बाळगून परस्पराविरुद्ध संघर्षाच्या तलवारी घेऊन उभे ठाकलेले दोन समाज मा. म. देशमुख यांच्या सुसंवाद आणि वाक्चातुर्याने जिवाभावाचे मित्र झाले, ही किमया केवळ मा. म. देशमुख यांच्याच पुढाकाराने घडून येऊ शकली.



भीमराव वैद्य
मो. 9422137540

यातूनच पुढे इंजि. पुरुषोत्तम खेडेकर यांच्या पुढाकाराने मराठा सेवा संघाचा उदय झाला. मराठा सेवा संघाने राष्ट्रमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख या राष्ट्रनिर्मात्या महापुरुषांना एका सूत्रात बांधून त्यांच्या मानवतावादी कल्याणकारी आणि उत्क्रांतवादी विचारधारेची बहुजन समाजात पेरणी केली. मानव जातीला हानिकारक असलेल्या आणि माणुसकीला पदोपदी तडा देणाऱ्या विकृत रूढी परंपरा मानणाऱ्या ब्राम्हणी धर्माचा त्याग करून नव्या मानव जातीला हितकारक असणाऱ्या शिवधर्माची मुहूर्तमेढ रोवली. समाज परिवर्तनाच्या या क्रांती लढ्यात प्रा. मा. म. देशमुख यांच्याबरोबर डॉ. आ. ह. साळुंखे, न्या. पी. बी. सावंत, न्या. कोळसे पाटील, श्रीमंत कोकाटे, श्रावण देवरे, जैमिनी कडू, प्रा. प्रभाकर पावडे, गंगाधर बनबरे, पी. बी. देशमुख यांच्याशिवाय तुळजापूरचे तुळजाभवानी संस्थानचे विश्वस्त, पंढरपूरच्या कैकाडी महाराजांचे अनुयायी असे बहुजन समाजाच्या उत्थानाचे स्वप्न साकार करू पाहणारे अनेक क्रांती सेनानी फुले-शाहू-आंबेडकर



विचारांचा झेंडा आपल्या खांद्यावर घेऊन समाजोद्धाराच्या क्रांती लढ्यात सामील झाले. यासाठी मा. म. देशमुख यांनी केवळ भाषणास्त्राचाच वापर केला नाही तर त्याच्या दिमतीला बहुजन समाजाला मानसिक आणि वैचारिक दृष्ट्या समृद्ध करून स्वातंत्र, समता, न्याय आणि बंधुत्वाच्या मूलभूत तत्त्वाची पेरणी करणाऱ्या ग्रंथसंपदेचीही निर्मिती केली. ज्यामध्ये शिवशाही सन्मार्ग राष्ट्र निर्माते मनुवाद्यांशी लढा, रामदास आणि पेशवाई, मराठा कुणबी समाजाची दिशा आणि दशा, बहुजन समाज आणि परिवर्तन समाज प्रबोधन, शिवराज्य, साहित्यिकांची जबाबदारी शनिवार वाडा बाकी आहे, बौद्ध धम्म आणि शिवधर्म वंश भाषा श्रेष्ठत्व आणि सत्य, मानवहिताय, प्राचीन भारताचा इतिहास, मध्ययुगीन भारताचा इतिहास (याच ग्रंथावर महाराष्ट्र शासनाने बंदी घातली होती; परंतु नंतर न्यायालयाने ती उठवली), युगप्रवर्तक शिवराय मनुस्मृतिवर नवा प्रकाश सावित्रीबाई फुले अशा चाळीसावर मौलिक ग्रंथ आणि पुस्तकांचा समावेश आहे. माझ्यावर मा. म. देशमुख जीवापाड प्रेम करायचे. 30 मार्च 1984 मध्ये नागपूर येथून माननीय कांशीराम यांनी प्रकाशित केलेल्या दैनिक बहुजन टाइम्सच्या संपादन कार्यात तर मा. म. यांनी फार मोठे योगदान दिले. जवळपास तीन वर्षे चाललेल्या दैनिक बहुजन टाइम्स करिता मा. म. यांनी अनेक संपादकीय लिहिले. केवळ लिहूनच ते थांबले नाही तर लिहिलेले संपादकीय कामठी रोडवरील बहुजन मुद्रणालयात स्वतः आणून देत. छपाईमध्ये काही अडचणी निर्माण झाल्या तर त्या दूर करण्यातही मा. म. चे मोठे योगदान होते. याशिवाय बहुजन टाईम्स आणि बहुजन नायकच्या संपादकीय, व्यवस्थापन तसेच प्रकाशकीय कार्यातही मा. म. देशमुख यांचा नेहमीच पुढाकार असे. या संदर्भात जेव्हा-जेव्हा दिल्ली येथे माननीय कांशीरामजी विचार विनिमय आणि पुढील दिशा ठरविण्यासाठी बैठका घेत त्या प्रत्येक बैठकांमध्ये मा. म. देशमुख आवर्जून सहभाग घेत. एवढेच नव्हे तर प्रत्येक वेळी ते माझ्या संपादन कार्याचे कांशीरामजी यांचेकडे कौतुक करीत. कांशीरामजी यांना मेंदू विकार (ब्रेन स्टोक) होऊन ते विस्मृतीत गेले, तेव्हा त्यांनी स्थापन केलेली बहुजन संघटक, बहुजन नायक ही वृत्तपत्रे बंद पडली. त्याचवेळी मराठा सेवा संघाच्या वतीने नागपूर येथून मराठा मार्ग नावाचे नियतकालिक सुरू झाले. प्रभाकर पावडे या मराठा मार्गचे संपादक होते. तेव्हा मा. म. देशमुख यांनी लागलीच इंजि. पुरुषोत्तम खेडेकर, मधुकर मेहरे, प्रा. प्रभाकर पावडे यांच्याशी चर्चा करून मराठा मार्गच्या संपादन कार्यात मला सहभागी करून घेण्याची शिफारस केली. याच दरम्यान मराठा सेवा संघाने नव्या शिवधर्माची स्थापना केली. त्यावेळी या शिवधर्माबद्दल समाजातील मान्यवरांची मते जाणून घेण्यासाठी मी अनेकांच्या मुलाखती घेतल्या. शिवधर्म परिषदेच्या पहिल्या चार परिषदांचे मी संपूर्ण वृत्तांकन केले. शिवधर्म परिषदांना प्रत्यक्षात उपस्थित राहिलो या सर्व कार्यवाहीत मा. म. मला नेहमीच प्राधान्य द्यायचे. पुढे माझ्या व्यक्तिगत अडचणीमुळे मी ‘मराठा मार्ग’ पासून अलिप्त झालो. तरीसुद्धा आमच्या संबंधात कसलाही खंड पडला नाही, आमच्यात वेळोवेळी भेटी व्हायच्या. 14 जानेवारी 2024 ला कामठी रोडवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर इन्टरनॅशनल कन्व्हेंशन सेंटरच्या ‘नागार्जुन’ सभागृहात माझा अमृत महोत्सवी जन्मदिवस शहरातील आंबेडकरी संघटनांनी साजरा केला. त्या अमृत महोत्सवी गौरव समारंभाचे मा. म. देशमुख हेच अध्यक्ष होते. त्यावेळी त्यांची तब्येत बरीच खालावली होती, तरीसुद्धा ते माझ्यावरील प्रेमापोटी त्या समारंभास उपस्थित राहिले. त्यांच्या अध्यक्षतेखाली माझा गौरव समारंभ व्हावा अशी माझी सुद्धा मनस्वी इच्छा होती आणि ती पूर्ण झाली. याबद्दल मला अतिशय धन्यता वाटते. शेवटी त्यांची तब्येत अधिकच खालावत जाऊन 19 मार्च 2025 रोजी मा. म. देशमुख यांनी अखेरचा श्वास घेतला. प्रा. मा. म. देशमुख यांनी एकूणच बहुजन समाजाच्या उत्थानासाठी आणि त्यांच्यात बंधूभाव निर्माण करण्यासाठी केलेले पराकोटीचे प्रयत्न समाज कधीही विसरणार नाही. अशा या महान सामाजिक क्रांती योद्धयाला माझे विनम्र अभिवादन! ■ ■

# आय.एम.ए. संघटनेच्या भुमीकेला होमीयोपैथीक संघटनेच्या विरोध




**नागपूर :** होमीयोपैथीक इंटिग्रेटेड मेडीकल प्रॅक्टीशनर्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्र हि महाराष्ट्रातील होमियोपैथीक डॉक्टरांची नोंदनीकृत संघटना असुन मागील 35 वर्षापासुन डॉक्टरांच्या समस्या व त्यांचेवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध लढणारी संघटना आहे.

महाराष्ट्र शासनाने वाढती लोकसंख्या व त्या प्रमाणात डॉक्टरांची कमतरता व ग्रामीण व अतीदुर्गम भागातील आरोग्याची दखल घेऊन होमीयोपॅथीक डॉक्टरांना 2014 मध्ये एक वर्ष कालावधीचा सर्टिफिकेट कोर्स ऑफ मॉर्डन फार्मकोलौजी हा ब्रीज कोर्स देऊन ॲलोपैथीक चिकित्सा करण्याची परवानगी देण्यांत आली. होमीयोपॅथीक डॉक्टरांच्या विषयाचे सील्याबस व एमबीबीएस डॉक्टरांचे सील्याबस चे विषय समान असुन शिक्षणाचा कालावधी सुद्धा सारखाच आहे. फक्त मॉडर्न फॉर्मकोलाजी हा विषय नसल्यामुळे शासनाने 1 वर्षाचा सीसीएमपी कोर्स होमीयोपैथीक डॉक्टरांना करायला लावुन त्यांचे वरील विषयाचे ज्ञान अपडेट करण्यांत आले. वरील अभ्यासक्रमाला शासनाच्या दोन्ही सभागृहाने मंजुरी दिली व आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक (एमयूएचएस) यांना पुढील कार्यवाही करीता अधिकार देण्यांत आले. त्यानुसार जेथे एमबीबीएसचे विद्यार्थी शिकतात त्याच महाविद्यालयात व त्यांनाच शिकवणाऱ्या शिक्षकांकडून वरील अभ्यासक्रमचे शिक्षण देण्यांत आले.

सीसीएमपी उत्तीर्ण डॉक्टरांना महाराष्ट्र वैद्यक परीषद (एमएमसी) मध्ये नोंदणी करण्याची मागणी मागील 8 वर्षापासुन सतत होती. ती आता पूर्ण झाली असुन एमएमसी ने 30 जुन 2025 रोजी या संबंधीची अधिसुचना प्रसिद्ध करून 15 जुलै 2025 पासुन स्वतंत्र नोंदवहीत नोंद करण्यांची प्रक्रिया सुरू केलेली आहे व त्यांस एमएमसी मधील शेड्युल 28 अंतर्गत स्वतंत्र नोंदणी पुस्तीका वेगळी ठेवण्याची तरतुद केली आहे. शासनाने पारीत केलल्या विधेयकांच्या विरोधात व होमीयोपॅथीक डॉक्टरांना ॲलोपॅथीकची प्रॅक्टीस तसेच एमएमसीमध्ये नोंदणीला विरोध केलेला आहे. या संदर्भात आईएमए ही संघटना उच्च न्यायालयात गेलेली असुन वरील विषय न्यायप्रविष्ठ आहे. तसेच या संदर्भात त्यांना कुठलाही स्टे मिळालेल नाही.

एमबीबीएसच्या सील्याबसनुसार फार्मकोलॉजी हा विषय एकच वर्षाचा आहे व होमीयोपॅथीक डॉक्टरांचा देखील एकच वर्षाचा आहे. त्यामुळे तुलना करणे चुकीचे आहे. आईएमए संघटनेचा शासनावर असा आरोप आहे की सीसीएमपी कोर्स केलेल्या डॉक्टरांना ॲलोपैथीक ची प्रॅक्टीस करू दिल्यास रुग्णांच्या जीवनाशी खेळ खेळल्यासारखे होईल हा आरोप चुकीचा आहे. कारण नागपुरात मोठे हॉस्पीटल व नर्सिंग होम 530 आहेत व त्यात हजारो होमियोपॅथीक डॉक्टर आर एम ओ पदावर कार्यरत असुन त्यांचे हॉस्पीटलमध्ये ॲलोपैथीकची सेवा देतात. परंतु तसेच डॉक्टर जेव्हा बाहेर प्रॅक्टीस करतात तेव्हा ते अवैध का ठरावे. वास्तविक शेड्युल 28 हे केवळ सीसीएमपी उत्तीर्ण डॉक्टरांच्या नोंदणी करीता स्वतंत्र नोंदणी पुस्तीका असल्यामुळे आईएमएच्या हक्काला व अस्मीतेला बाधा पोहचत नाही. त्यामुळे आईएमए संघटनेने शासन निर्णयाला विरोध करू नये व शासनानी एमएमसीमध्ये नोंदणी संबंधी घेतलेला निर्णय बदलु नये अशी मागनी हिम्पाम संघटनेचे अध्यक्ष डॉ. सुभाष राऊत यांनी केली आहे. पत्र परीषदेला संघटनेचे सचीव डॉ. आनंद गादेवार, डॉ. रविन्द्र पारख, डॉ. डी. बी. चौधरी, डॉ. बी. के. चौधरी, डॉ. राजेश रथकंठीवार, डॉ. छाया दुरूगकर, डॉ. अरविंद बुटले, डॉ. प्रवीण पारख, डॉ. संजय सहारे, डॉ. कुशल नारनवरे, डॉ. राजेश काळे, डॉ. नीलेश वाडीभस्मे, डॉ. ओम शेंडवरे, डॉ. अरुण गवली, डॉ. हेमंत साले, डॉ. सुरेखा रंगारी, डॉ. वासंती राऊत, डॉ. एम. ए. रशीद उपस्थित होते.

# प्रधानमंत्री पिक विमा योजनेच्या भित्तीपत्रकाचे हस्ते अनावरण



**नागपूर :** स्थानिक जिल्हा जिल्हा अधीक्षक कृषी कार्यालयात खरीप हंगाम 2025 मधील राष्ट्रीय कृषी विकास योजना अंतर्गत आयोजित कार्यशाळेत, प्रधानमंत्री पिक विमा योजनेच्या भित्तिपत्रिकाचे अनावरण मा. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र मनोहरे, जिल्हा सांख्यिकी सागर कांबळे भारतीय कृषी विमा कंपनीचे विभागीय प्रमुख विशाल चौधरी जिल्हा समन्वय मंगेश गुल्हाने यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाला जिल्ह्यातील प्रगतिशील शेतकरी, पुरस्कारप्राप्त शेतकरी तसेच कृषी विभागाचे अधिकारी उपस्थित होते. सुधारित पिक विमा योजनेचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा अशी विनंती जिल्हाधिकाऱ्यांना यावेळी केली. तसेच पिक विमा प्रतिनिधींनी आपली जबाबदारी चोखपणे पार पाडावी शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचून त्यांना योजने विषयी माहिती द्यावी तसेच पिक विमा काढण्यात सुद्धा मदत करावी अशा सूचना देखील देण्यात आल्या. प्रधानमंत्री पिक विमा योजनेबद्दल शेतकऱ्यांचे असलेले गैरसमज दूर करण्यामध्ये सर्वांनी आपले योगदान द्यावे असे देखील त्यांनी यावेळी प्रतिपादन केले. तसेच यावर्षी महाराष्ट्र शासनातर्फे सुधारित पिक विमा योजनेमध्ये अत्यंत चांगले बदल केले असून ते शेतकऱ्यांच्या हिताचे आहे असेही त्यांनी यावेळी सांगितले.




## सिध्दार्थ बुद्ध विहार

मातोश्री रमाबाई आंबेडकर नगर, जयतळा, नागपूर. विहारामध्ये दररोज नियमितपणे वंदना, पौर्णिमा उत्सव, वर्षावास, बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकर, सम्राट अशोक यांच्या जयंती उत्सव समारोह, विविध सामाजिक सांस्कृतिक, शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.

संवाद मित्र, डी.आर. कांबळे
मो.8600924170

## महत्वाचे

### आलोका संघाराम महाविहार येथे वर्षावास सोहळा



**नागपूर :** आलोका ट्रस्ट तर्फे आलोका संघाराम महाविहार संघर्ष नगर, आटोमोटिव्ह चौक, नागपूर येथे ट्रस्टचे अध्यक्ष व आंतरराष्ट्रीय विपस्सना आचार्य पुज्य भदन्त विनयरंख्खीत महास्थविर यांच्या मार्गदर्शनात व सचिव भदन्त ज्ञानबोधी महास्थविर भीक्खु प्रविण व श्रामनेर संघाचे प्रमुख उपस्थितीत आषाढ पौर्णिमा निमित्त वर्षावास सुरू करण्यात आला. परित्त संज्झायन धम्मदेसना भीक्खु संघास भोजनदान, संघदान करण्यात आले, यावेळी मोठ्या संख्येने उपासक-उपासिका व युवा वर्ग उपस्थित होते. आलोका संघाराम महाविहार येथे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी अध्ययन कक्ष नर्सरी स्कूल मेडिटेशन शिबीर सुसंस्कार शिबीर आयोजित करण्यात येतात अशी माहिती ट्रस्टचे कोषाध्यक्ष भदंन्त नाग दिपंकर महास्थविर यांनी सांगितले.

### सम्राट अशोक बुद्ध विहार अभयनगर येथे धम्म सांगोष्टी



**नागपूर :** पुरोगामी प्रबोधन चळवळीच्या, विहार संवाद समितीचा दि. 10.07/2025 ला सायं.7 वाजता अभयनगर बुद्ध विहारात, तेथील जनतेच्या आग्रहास्तव धम्मसंगोष्टीचा कार्यक्रम घेण्यात आला. त्यावेळी नामदेवराव पखाले हे कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते, तर जितेंद्र गेडाम एमबीबीएस एम डी, तसेच सुधाकर स्थूल हे उपस्थित होते. विहार संवाद समितीच्या विदर्भ अध्यक्ष ज्योत्स्ना बनसोड या कार्यक्रमाचे मार्गदर्शक म्हणून, विहाराची उत्पत्ती आजचे वास्तव आणि अपेक्षित दिशा या विषयावर सुंदर असे मार्गदर्शन केले. तसेच नागपूर शाखेचे अध्यक्ष रंगराज गोसावी, यांनी सुद्धा आंबेडकरी व्यक्तीचे कर्तव्य आणि त्यांची भूमिका यावर मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच पुरोगामी प्रबोधन चळवळीचे अध्यक्ष रवी हाडे यांनी चळवळीचे उद्दिष्ट काय आहे यावर थोडक्यात चर्चा केली, प्रस्तावना विहार संवाद समितीच्या नागपूर शाखेच्या अध्यक्षा, शिल्पा मकेश्वर यांनी मांडली. तर संचालन वाघमारे साहेबांनी केले, तर कार्यक्रमाला प्रामुख्याने विद्यार्थी वर्ग आणि उपासक-उपासिका मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सम्राट अशोक बुद्ध विहार येथील कमिटी, अध्यक्ष मायावती गोंडाने, सचिव कांता वाघमारे, प्रदीप वाघमारे, संजय शहारे, राजेंद्र पाटील आणि संपूर्ण उपासक, उपासिकांनी तसेच लहान मुलांनी सुद्धा प्रयत्न केले.

### भारतीय बौद्ध महासभा नगर शाखेच्या वतीने वर्षावास प्रवचन मालिकाचे उद्घाटन



**नागपूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर चॅरिटेबल ट्रस्ट अंतर्गत भारतीय बौद्ध महासभेचे मुख्य कार्यालय हरदास नगर कांडप मशीन जवळ, उत्तर नागपूर येथे भारतीय बौद्ध महासभा नगर शाखा उत्तर नागपूर च्या वतीने वर्षावास प्रवचन मालिकाचे उद्घाटन करण्यात आले. भारतीय बौद्ध महासभा नगर शाखेच्या अध्यक्षा पंचशीला सहारे, यांनी वर्षावास प्रवचन मालिकाचे उद्घाटन केले. या प्रसंगी प्रामुख्याने उपस्थित सरोज खोब्रागडे केंद्रीय शिक्षिका, यांनी वर्षावास व गुरू पौर्णिमाचे महत्त्व यावर उपासिका यांना मार्गदर्शन केले, कार्यक्रमात उपस्थित वर्षा धारगावे, अध्यक्ष वंचित बहुजन आघाडी उत्तर नागपूर, विशाखा लोखंडे, गीता जांभूळकर, माया मेश्राम, साधना सोमकुवर, संध्या पाटील, रमा सोमकुवर, हर्षिका सहारे, रशिका सहारे, यांनी परिश्रम घेतले, कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन गीता जांभूळकर कोषाध्यक्ष यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

## निधन वार्ता

### उद्धवराव वासनिक



**नागपूर :** न्यू इंडिया एश्योरंस कंपनी लिमिटेड येथील सेवानिवृत्त वरीष्ठ मंडळ अधिकारी उद्धवराव वासनिक यांचे दि. 11 जुलै 2025रोजी सकाळी हृदयविकाराचा आघात होऊन निधन झाले. ते 72 वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी रत्ना, मुले निखिल व प्रतीक, सून सुदीपता व बराच मोठा आप्त परिवार आहे. सहकारनगर स्मशान घाटावर अंत्यसंस्कार पार पडले.

# रत्नशील बुद्ध विहार आदर्शनगर येथे ऐतिहासिक धम्मचक्र प्रवर्तन दिन



**नागपूर :** ऐतिहासिक धम्मचक्र प्रवर्तन दिन 'आषाढ पौर्णिमा'चा कार्यक्रम रत्नशील विकास समिती आणि त्रिरत्न बौद्ध महासंघ - केंद्र सुखावती, नागपूरच्या संयुक्त विद्यमाने रत्नशील बुद्ध विहार आदर्श नगर, नागपूर येथे संपन्न झाला. या कार्यक्रमात मुख्य मार्गदर्शक प्रवचनकार धम्मचारिनी ओजोगिता होत्या. प्रथम विहारात त्यांचे आगमन झाल्यावर विहाराच्या प्रांगणातील बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आले. त्यानंतर आदर्शाची पूजा करण्यात आली. कार्यक्रमांची सुरुवात धम्ममित्र करुणा झोडपे व त्यांच्या टीमनी पाली पूजा, वंदनानी केली. धम्ममित्र ब्रह्मकला दहीवले यांनी सुंदर गीत सादर केले. कार्यक्रमांचे प्रास्ताविक किशोर इंदुरकर यांनी केली. धम्मचारिनी ओजोगिता यांनी आपल्या मार्गदर्शनात आजच्या ऐतीहासिक धम्मचक्रदिनासोबतच आषाढ पौर्णिमा भगवान बुद्धाच्या जीवनाशी संबंधित असलेल्या महत्वाच्या घटना घडल्या होत्या त्या सांगितले. त्यांनी आपल्या प्रवचनात एक आपण बौद्ध म्हणून आपले कर्तव्य, जबाबदारी काय आहे? यावर सविस्तर असे मुद्यावर भाष्य केले. 1- धम्माचे जतन (संगोपन) करणे, एकीने राहणे, मैत्रीपूर्ण वागले पाहिजे.(मैत्रीपूर्ण संबंध)विहारातून वर्षावासाच्या निमीत्ताने गाथा पारायण न करता सुत्ताचा अभ्यास केला पाहिजे, अनेक ग्रंथ, बद्ध आणि त्याचा धम्म या ग्रंथाचे वाचन करुन, तो आचरणात आणला पाहिजे आणि शेवटी आपण सर्वांशीच मैत्रीपूर्ण संबंध विकसित केले पाहिजे. असे ओजोगिता यांनी अतिशय हृदयाला भिडणारे मार्मिक शब्दात त्यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे संचालन धम्मचारी चंद्रकेतू यांनी केले, सुखावती केंद्राच्या पहिला वर्धापन दिनानिमित्त केंद्राने वर्षभर केलेल्या कार्याचा आढावा सांगितला. या कार्यक्रमात शशिकला कुंभारे, ओजोगितासोबत होत्या आणि त्यांनीच आभार प्रदर्शन सर्वाचे मानले. या कार्यक्रमात धम्ममित्र सविता शेंडे आणि धम्ममित्र शिला लोणारे यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# के.के. इंग्रजी प्रायमरी शाळेत 'गुरुपौर्णिमा' साजरी

**आमगांव :** के.के. इंग्रजी प्रायमरी शाळेत शाळेच्या प्राचार्या रीना भुते यांच्या उपस्थितीत गुरुपौर्णिमा आनंदात साजरी करण्यात आली. कार्यक्रमात शाळेच्या प्राचार्या, शिक्षक वृंद, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात रीना भुते यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून करण्यात आली. त्यानंतर शिक्षिका केसर बिसेन यांनी विद्यार्थ्यांना आपल्या भाषणातून गुरुचे आपल्या जीवनात असलेले महत्त्व समजावून सांगितले. शाळेच्या प्राचार्या रीना भुते यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना आपल्या जीवनात प्रथम गुरू तसेच द्वितीय गुरु यांचे किती महत्त्वाचे स्थान आहे, गुरु कशाप्रमाणे जीवन जगण्याचे धडे शिकवत असतात, हे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

## निधन वार्ता

### सिंधुबाई माधवराव इटनकर



**नागपूर :** नंदनवन येथील श्रीकृष्ण नगर येथील प्लॉट क्रमांक 13 येथील रहिवासी सिंधूबाई माधवराव इटनकर यांचे शुक्रवारी निधन झाले. मृत्युसमयी त्या 73 वर्षांच्या होत्या. शनिवारी 12 जुलै रोजी सकाळी 10 वाजता गंगाबाई घाटावर अंत्यसंस्कार केले जातील. त्यांच्या पश्चात दोन मुले, चार मुली आणि असंख्य नातेवाईक असा परिवार आहे.

# बुद्ध हेच पहिले वैश्विक आणि शाश्वत गुरु : किशोर कासारे




**मंडणगड :** मंडणगड तालुका विकास मंडळ संचलित लाल बहादूर शास्त्री हायस्कूल दहागावमध्ये गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. त्यानिमित्ताने लेखक किशोर कासारे यांनी आपले मत मांडले.

गुरुपौर्णिमेचे निमित्त साधून विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापक व शिक्षकांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत केले. त्याप्रसंगी बोलताना लेखक किशोर कासारे म्हणाले की, गुरु हा जीवनातील दीपस्तंभ असतो. जो अज्ञानाच्या अंधःकारातून ज्ञानाच्या प्रकाशाकडे घेऊन जातो. तथागत गौतम बुद्ध सर्वप्रथम भारतीय मानव समूहाला ज्ञानाच्या प्रकाशाकडे घेऊन गेले. त्यांची शिकवण अंधश्रद्धा, कर्मकांड, जातपात यापासून मुक्त होती. त्यांनी मानवाला स्वपरीक्षण, नैतिकता, करुणा आणि अहिंसेचा संदेश दिला. 'अत्त दीप भव' हा संदेश दिला. तथागतांनी केलेल्या धम्मचक्र प्रवर्तनापासूनच गुरुशिष्य परंपरेची पहिल्यांदा सुरुवात झाली. असे त्यांनी सांगितले. यानंतर प्रशालेतील शिक्षिका विनया नाटेकर यांनीही मार्गदर्शन केले. यानंतर मुख्याध्यापक विजय खाडे यांनी आपण निसर्गाकडून शिकले पाहिजे, असे विद्यार्थ्यांना म्हणाले. निसर्ग हा मोठा गुरु असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाचे संचालन स्मरणिका गायकवाड व प्रांजल लोखंडे यांनी केले. आभार प्रदर्शनाने या कार्यक्रमाची सांगता झाली.

# मजबूत अर्थ व्यवस्थेचे सूत्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले : सचिन शेंडे



**नागपूर :** भारतीय रुपया बद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी व्यक्त केले विचार आजही प्रासंगिक आहे. तर स्वतः विषयी माहिती देतांना सांगितले की, ऋद्ध मध्ये कार्य करतांना उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल गोल्ड मेडल मिळाले आहे असे सचिन शेंडे यांनी सांगितले.

मी पूर्ण वेळ सामाजिक कार्य करीत असतो असे देवीदास राऊत यांनी सांगितले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 1927 मध्ये दारूबंदी विषयी 'नवयुग' मध्ये दिलेली मुलाखत प्रसारित झाली होती.

त्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले होते की, अनधिकृत दारूचे दुकान बंद करावे. त्यामुळे गुन्हेगारीवर निश्चितच आळा बसेल असे राजीव गाडे यांनी सांगितले.

धम्म पदाच्या 157 व्या गाथेबद्दल विश्लेषण करून सांगितले, तुम्ही स्वतःवर प्रेम करा असे तथागत गौतम बुद्ध म्हणतात. कुशल कर्मे करा हा उपदेश दिला. बोधी राजकुमार व तथागत गौतम बुद्ध विषयी बोधप्रद कथा सांगितली उत्तम उके यांनी सांगितले.

राष्ट्रगीत प्रा. नंदा भगत आणि संगीता पानतावणे, संचालन डॉ. शंकर खोब्रागडे, आभार प्रकाश सोनटक्के, शांताराम रंगारी यांनी सहकार्य केले.

शनिवार दि.05 जुलै 2025 ला बहुजन हिताय संघाची 426 वी साप्ताहिक सभा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मिशन सभागृह नागपूर येथे झाली.

तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून मेणबत्ती, अगरबत्ती प्रज्वलित ऊत्तम ऊके यांनी उपस्थिताकडून त्रिशरण, पंचशील, बुद्ध वंदना सामुहिक वदवून घेतले.

प्रमुख अतिथी सचिन शेंडे यांनी उपस्थिताकडून बावीस प्रतिज्ञा वदवून घेतल्या. प्रज्ञापिठावर उपस्थित मान्यवरांचे पुष्प गुच्छ आणि पंचशील दुपट्टा देऊन स्वागत करण्यात आले.

# डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक समतेच्या संकल्पनेवर दोन दिवसीय व्याख्यान

**विद्यार्थ्यांना सामाजिक विज्ञानाच्या संशोधनात शास्त्रशुद्ध दृष्टिकोन अंगीकारण्याचे आवाहन**




**नागपूर :** डॉ. आंबेडकर अभ्यासन व विचारधारा विभागाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सामाजिक समतेविषयीची संकल्पना आणि सामाजिक विज्ञानाची संशोधन पद्धती या विषयांवर 9 व 10 जुलै 2025 रोजी दोन दिवसीय व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले. या व्याख्यानमालेत डॉ. अजय चौधरी, प्राध्यापक, डॉ. आंबेडकर चेअर, सिंबायोसिस इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी, पुणे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. अविनाश फुलझेले, विभाग प्रमुख, डॉ. आंबेडकर चेअर व विचारधारा विभाग होते. पहिल्या सत्रात (9 जुलै) डॉ. अजय चौधरी यांनी डॉ. आंबेडकरांनी मांडलेली सामाजिक समतेची संकल्पना विशद केली. त्यांनी सांगितले की, 'डॉ. आंबेडकरांनी असमान प्रतिकूल परिस्थितीतून समतेचा मार्ग दाखवत तळागाळातील लोकांपर्यंत न्याय पोहोचवण्यासाठी संघर्ष केला. विविधतेत एकता निर्माण करण्यासाठी त्यांच्या विचारांची आजच्या काळात अधिक गरज आहे.' दुसऱ्या सत्रात (10 जुलै) डॉ. चौधरी यांनी फ्रेंच समाजशास्त्रज्ञ एमिल दुर्खाईन यांच्या पवित्रता व अपवित्रतेच्या संकल्पना मांडत त्या डॉ. आंबेडकरांच्या अस्पृश्यतेवरील चिंतनाशी कशा जोडल्या जाऊ शकतात याचे विवेचन केले. त्यांनी स्वकथन या संकल्पनेचाही संदर्भ देत सांगितले की, संशोधकाने आपला दृष्टिकोन तटस्थ ठेवून वैज्ञानिक पद्धतीने संशोधन करणे आवश्यक आहे.अध्यक्षीय भाषणात डॉ. अविनाश फुलझेले यांनी भारतीय समाज जीवनाच्या संदर्भात डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक समतेच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी विद्यार्थ्यांना सामाजिक विज्ञानाच्या संशोधनामध्ये शिस्तबद्ध व शास्त्रशुद्ध दृष्टिकोन बाळगण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे संचालन एम.ए. (सेमेस्टर 3) चे विद्यार्थी अल्का जरोंडे आणि अरविंद टेंभुर्णे यांनी केले. आभार प्रदर्शन वसंत खिरळे आणि राजेंद्र कांबळे यांनी केले. कार्यक्रमाला डॉ. गौतम कांबळे, डॉ. रमेश शंभरकर, डॉ. सरोज डांगे, डॉ. मोहन वानखडे, मंगेश जुनघरे, प्रीती वानखेडे, तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

# पी.एस.आय.देविदास गॅरल सेवानिवृत्ती निमित्त सन्मानित

**देवीदास गॅरल सखोल तपासणी करणारे पी.एस.आय. : ठाणेदार दराडे**




**पिंजर :** पी.एस.आय. देविदास गॅरल पी.एस.आय. म्हणून सेवानिवृत्ती निमित्त ठाणेदार यांनी त्यांची नोकरी ईमाने इतबारे केली. कोणताही तपास थातूर मातूर न करता सखोल चौकशी करून तपास करणारे अधिकारी म्हणून गॅरल यांचे नाव घ्यावे लागेल. त्यांचेवर संकटे आली, परंतू त्यावर देखिल त्यांनी मात करून जिद्दीने त्याचा सामना करण्याची ताकद त्यांनी दाखविली. असा वारकरी पंथाचा मनुष्य शोभावा असे देविदास गॅरल यांचे काम आहे. एक वर्षापासून पिंजर येथे ते कर्तव्यावर आहेत. सोपून दिलेली जबादारी चोखपणे पार पाडणारे पी.एस.आय. देविदास गॅरल असल्याचे सांगून ज्यामध्ये देविदास गॅरल यांच्या पत्नी निता गॅरल, मुलगी लिना, मुलगा दिगंबर या कुटूंबाचा ड्रेस, साडी-चोळी व पुष्पगुच्छ देवून ठाणेदार दराडे यांनी या दाम्पत्याचा सत्कार केला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सामाजिक न्याय व मानवाधिकार सेवा संघाचे विजयकुमार गडलिंगे, आकाशवाणीचे प्रतिनिधी मधू कसबे, पत्रकार पंजाबराव वर, पी.एस.आय. पातोंडे, चव्हाण मेजर, उघडे मेजर, काळे मेजर, मोहोड मेजर यांच्यासह पोलीस स्टेशन कार्यालयातील समस्त कर्मचारी व अधिकारी कार्यक्रमाला उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष तथा नारी ललकार वृत्तपत्राचे संपादक पंजाबराव वर यांनी केले.




बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648